नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...



### राज्यात डॉक्टरांची लवकरच नियुक्ती

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी उपलब्ध झालेल्या एक हजार ४४० डॉक्टरांची येत्या काही दिवसांत नियुक्ती करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आणखी ६०० डॉक्टरांच्या भरतीसाठी जाहिरात काढण्यात येत असून सुमारे २५० दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेत दाखल होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी आरोग्यमंत्र्यांनी ऑनलाइन 'जन आरोग्य संवाद' साधला. या माध्यमातून आतापर्यंत सहा लाखांहून अधिक नागरिकांशी संवाद साधण्यात आला आहे. आगामी काळात आणखी चार लाख नागरिकांशी संवाद साधण्यात येणार असून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### दहिहंडी उत्सवाला युनेस्कोमध्ये घेऊन जाणार

मुंबई (स. गांवकरी) : दहिहंडी उत्सवाला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळावे यासाठी राज्य सरकारच्या वतीने प्रयत्न करणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी रविवारी मुंबईत दिली. महाराष्ट्रातील दहीहंडी पथक, गोविंदा आणि दहीहंडी उत्सवासाठी कार्यरत असलेल्या विविध संघटनांच्या सहभागातून स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनच्या वतीने परळमध्ये 'कृष्णानंद सोहळा' आयोजिण्यात आला होता. परळच्या राष्ट्रीय मजदूर मिल संघात झालेल्या या सोहळ्यात बोलताना त्यांनी ही माहिती दिली. गोविंदांना स्पेनलाही पाठवणार असल्याची घोषणा त्यांनी केली. तसेच उत्सव साजरे करताना सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करा, असे आवाहन त्यांनी मंडळांना केले.




### १०६ हुतात्म्यांना मानाचे स्थान!

मुंबई (स. गांवकरी) : संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हौतात्म्य पत्करलेल्या १०६ हुतात्म्यांचे चिरंतन स्मरण व्हावे, यासाठी महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतलेल्या एअर इंडियाच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात या सर्व हुतात्म्यांची नावे ठळकपणे आणि सन्मानपूर्वक प्रदर्शित करण्याच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी फडणवीस यांना पत्र पाठवून ही मागणी केली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या ऐतिहासिक आंदोलनात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्राची निर्मिती झाली असून, या हुतात्म्यांचे योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे, असे ॲड. शेलार यांनी पत्रात नमूद केले होते.

# उद्योगांबाबत 'भगवी श्वेतपत्रिका'



पिंपरी : (स. गांवकरी)

**■ 'यामुळे' ३६ हजार २११ कंपन्या बंद; उदय सामंत यांची माहिती**

दावोसमध्ये किती कंपन्यासोबत करार झाले, किती गुंतवणूक आली, याची भगवी श्वेतपत्रिका काढली जाणार आहे. त्याच्यावर काम सुरू आहे. वेदांता फॉक्सन, एअर बस प्रकल्पाची श्वेतपत्रिका काढली होती. त्यावर कोणीही चर्चा केली नाही, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. उद्योगमंत्री सामंत यांनी रविवारी चाकणमधील एमआयडीसी आणि पीएमआरडीएच्या रस्त्याची पाहणी केली. त्याचबरोबर उद्योजकांनी सांगितलेल्या ठिकाणांचीही त्यांनी पाहणी केली. त्यानंतर उद्योग संघटनेचे प्रतिनिधी, उद्योजक आणि अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, एमआयडीसीची मोकळी जागा पार्किंगसाठी दिली जाणार आहे. ज्या कंपन्यांकडे ३०० एकर जागा आहे. त्यांनी वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करावी. महामार्गालगत वाहने उभी करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. गुन्हेही दाखल केले जातील. पर्यायी मार्ग करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांना अधिकार दिले आहेत. चाकण आणि परिसरातील समस्या केवळ बैठकीपुरत्या मर्यादित न ठेवता त्यावर सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दर शुक्रवारी पुणे जिल्हाधिकारी 'दरबार' घेऊन स्थानिक प्रश्नांचा आढावा घेतील आणि त्याचवेळी शक्य तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. याशिवाय दर दोन महिन्यांनी मी आढावा बैठक घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

#### दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई

चाकणच्या उद्योजकांना न्याय दिला जाणार असून त्यांच्यातील संभ्रम दूर केला जाणार आहे. तीन रस्ते ताकदीने पूर्ण केले तर कोंडीच्या समस्येतून काहीसा दिलासा मिळेल. रस्ते, वाहनतळाचे प्रश्न आहेत. १८ किलोमीटर मार्गिकेचे काम शिल्लक असून पूर्ण केले जाईल. दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. समस्यांचे कोणी राजकीय भांडवल करू नये. सर्वांनी मिळून उद्योजकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. टीका टिप्पणी निवडणूक कालावधीत केली जाईल, असेही सामंत म्हणाले.

पाच वर्षात ३६ हजार २११ कंपन्या बंद झाल्या आहेत. त्यामध्ये कृषी, पर्यटन, मायनिंग, उत्पादक, जागा खरेदी विक्री, बांधकाम व्यावसायिक अशा कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांनी सन २०१३ च्या कंपनी कायद्याची कार्यवाही पूर्ण न केल्याने बंद झाल्या आहेत, असा दावा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला.

#### अत्याधुनिक रुग्णालय उभारणार

एमआयडीसीतील प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. प्रत्येक संस्थेकडून काम करून घेण्याचे अधिकार त्यांना दिले आहेत. वेळेत काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे अधिकार दिले आहेत. ट्रक टर्मिनल केले जाणार असून रुग्णालयासाठी जागा दिली जाणार आहे. जिल्हा प्रशासन अत्याधुनिक रुग्णालय उभारणार आहे. जल जीवन मिशन अंतर्गत पाणी दिले जाणार आहे. लवकरच पाणीपुरवठा मंत्री बैठक घेतील, असेही त्यांनी सांगितले.

## सध्याचे सरकार इंग्रजापेक्षाही वाईट, शक्तीपीठ महामार्गासाठी एक इंचही जमीन देणार नाही !

**एल्गार परिषदेत राजू शेट्टी यांचा इशारा**



परभणी : (स. गांवकरी)

सध्याचे सरकार इंग्रजांपेक्षाही वाईट आहे. या सत्तेत ठग, पेंढारी बसलेले आहेत. शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात बारा जिल्ह्यातील शेतकरी एकवटले आहेत. शक्तीपीठ महामार्गासाठी एक इंचही जमीन दिली जाणार नाही असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी येथे दिला. परभणी तालुक्यातील पोखर्णी नृसिंह येथे रविवारी (दि.१६) शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने एल्गार परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेचे उद्घाटन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या हस्ते दिप प्रज्वलित करून झाले. यावेळी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाचा निषेध करत आसूड उगारण्यात आला. एल्गार परिषदेला राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर,माजी खासदार तुकाराम रेंगे,माजी आमदार विजय गव्हाणे, किसान सभचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉम्रेड राजन क्षीरसागर,कॉ. गिरीष फोंडे, कॉ. अजय बुरांडे,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे किशोर ढगे,भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कॉ. माधुरी क्षीरसागर, सोनाली देशमुख, माजी आमदार व्यंकटराव कदम, नागोराव पांचाळ, शिवलिंग बोधने,गोविंद घाटोळ, ओंकार पवार आदि यावेळी उपस्थित होते. माजी मंत्री महादेव जानकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार टीका करून यांना सत्तेचा अहंकार आला आहे असे सांगत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात ठराव घ्यावेत असे आवाहन केले. अखिल भारतीय किसान सभेचे राजन क्षीरसागर यांनी एकीकडे सरकारच्या तिजोरी ठणठणात आहे पण शक्तिपीठ महामार्गावर एक लाख वीस हजार कोटी रुपयांचा खर्च केला जात आहे. शेतकरी सरकारच्या विरोधात ठामपणे उभे असून प्रसंगी छातीवर गोळ्या झेलण्याची तयारी असल्याचे ते म्हणाले.

## कॅन्सर रुग्णांना दिलासा देणारी प्रोटॉन थेरेपी लवकरच पुण्यात

पुणे: (स. गांवकरी)

**■ मुंबई खालोखाल पुण्यातही होणार उपचार**

कर्करोगावरील अत्यंत प्रभावी मानली जाणारी 'प्रोटॉन थेरपी' आता शासन आणि रुबी हॉल यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात सर्वसामान्यांना परवडेल अशा अत्यंत कमी खर्चात सुरू करण्यात येणार आहे. ही सुविधा सध्या केवळ मुंबईत उपलब्ध आहे. गरजू रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय उपचार परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभाग आणि रुबी हॉल क्लिनिक यांच्यात मंत्रालयात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



या बैठकीस रुबी हॉल रुग्णालयाचे विश्वस्त डॉ. परवेझ ग्रँट, डॉ. सायमन ग्रँड, आरोग्य विभागाचे सहसचिव डॉ. मिलिंद कदम, वैद्यकीय सहायता कक्षाचे कौस्तुभ थोरात, प्रसाद बिराजदार आणि गणेश तिकोने उपस्थित होते. त्यात विविध निर्णय घेण्यात आले. यातील निर्णयांनुसार, महात्मा फुले व पंतप्रधान जन आरोग्य योजनेअंतर्गत आता रुबी हॉल क्लिनिकसारख्या अंगीकृत रुग्णालयामध्ये कार्डियाक (हृदयरोग) आणि कर्करोग उपचारांसाठीसुद्धा सर्वसामान्य रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच, अवयव प्रत्यारोपणासारख्या अत्यंत महागड्या शस्त्रक्रियांसाठी शासकीय योजनेची मर्यादा ओलांडल्यास, उर्वरित खर्चासाठी विशेष 'शासकीय कॉर्पस फंड'मधून अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, जेणेकरून अवयव दान आणि प्रत्यारोपण मोहिमेला गती मिळेल.

## ओबीसी सरपंचपदाच्या जागांबाबत सुधारित आदेश

**५०० हून अधिक जागा खुल्या प्रवर्गात; सुधारित आदेश जारी!**

नागपूर : (स. गांवकरी)



केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचे जाहीर केले होते. परंतु जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ओबीसीसाठी जातीचा रकाना नसल्याने प्रत्यक्ष जातनिहाय गणना होणार नसल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे. यातच आता ओबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५०० जागा या खुल्या प्रवर्गात वर्ग करण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आरक्षण ५० टक्केच्या मर्यादेत ठेवण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाकडून काढण्यात आल्यानंतर ग्राम विकास विभागाने १५ जिल्ह्यातील ओबीसीच्या सरपंचपदाबाबतचे सुधारित आदेश काढले. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींच्या आरक्षणाचा मुद्दा निकाली काढल्यानंतर शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे जाहीर केले. नगर पंचायत, नगरपालिका, महापालिका आणि जिल्हा परिषदांसोबत ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये ओबीसीसाठी २७ टक्के आरक्षणानुसार जागा निश्चित करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले होते. त्यामुळे काही महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत, जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींत आरक्षण हे ५० टक्क्यांवर गेले. राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचातींतील जागा ५० टक्केच्या मर्यादेत आरक्षित ठेवण्याचे ३० एप्रिल २०२६ आदेश काढलेत. त्यामुळे सरपंचपदासाठी आरक्षित पदांची संख्या पूर्वीच्या तुलनेत ५१२ ने कमी झाली असून खुल्या वर्गातील पदे वाढवण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने १३ जून २०२५ रोजी आरक्षण निश्चित करण्याबाबतची अधिसूचना काढली होती. यानुसार १५ जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये ओबीसीकरिता सरपंचपदासाठी ६७१९ जागा आरक्षित होत्या. यातील ३३७३ जागा महिलांसाठी तर खुल्या प्रवर्गासाठी १३०७७ जागा होत्या. यातील ६५४१ पदे हे महिलांसाठी आरक्षित होत्या. परंतु आता राज्य निवडणूक आयोगाने ३० एप्रिलला आरक्षित जागांबाबत नव्याने आदेश कढलेत. त्यामुळे आता ओबीसीसाठी आरक्षित करण्यात येणाऱ्या सरपंचपदाची संख्या कमी करण्यात झाली आहे. आता ६२०७ जागा ओबीसीसाठी आरक्षित करण्यात आल्या असून यातील ३१११ जागा या महिलांसाठी राखीव करण्यात आल्यात. तर खुल्या वर्गासाठी १३५८९ जागा असून यातील ६८०३ पदे महिलांसाठी राखीव असतील.

**या जिल्ह्यांसाठी सुधारित आदेश** : धुळे, जळगाव, हिंगोली, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा.

## आणखी एका परीक्षेत गोंधळ, उच्च न्यायालयात लिपिक भरती

**मराठवाड्यासह कल्याणमधील केंद्रांवर समस्या**

छत्रपती संभाजीनगर : (स. गांवकरी)

मुंबई उच्च न्यायालयाच्या लिपिक पदासाठीच्या रविवारी घेण्यात आलेल्या टंकलेखन परीक्षेत 'सर्व्हर डाऊन'सारखी समस्या उद्भवल्याने मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरसह नांदेड येथील केंद्रांवरील विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ उडाला. याखेरीज कल्याणमध्ये बाजार समिती आवारातील परीक्षा केंद्रांवर दिवसभर विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठवाड्यासह विदर्भातील जवळपास २९०० तर राज्यभरातून १३ हजार विद्यार्थी या परीक्षेसाठी बसले होते. या प्रकाराची माहिती मिळताच कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजित दिपके हे गोंधळ उडालेल्या छत्रपती संभाजीनगरमधील सुराणानगरच्या केंद्रावरील विद्यार्थ्यांच्या भेटीसाठी दाखल झाले. या वेळी दिपके यांनी विद्यार्थ्यांसह ठिय्या आंदोलन करणार असून, जोपर्यंत जिल्हा न्यायाधीश येऊन पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घेणार नाहीत, तोपर्यंत येथून हलणार नाही, असा पवित्रा घेतला. शहरातील सुराणानगरसह सातारा परिसरातील केंद्रांवरही गोंधळ उडाल्याचे चित्र आहे. संगणकावरील पटल पिवळा पडणे, टंकपट न चालणे आदी अडचणींचा सामना करावा लागल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली. तसेच ही परीक्षा पुन्हा घ्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. या वेळी पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले यांच्यासह त्यांच्या पथकाने विद्यार्थ्यांना शांत राहण्याचे आवाहन केले.

दरम्यान नांदेडमधील परीक्षार्थींकडूनही याबाबत तक्रार करण्यात आली. ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळाच्या केंद्रावरील प्रमुखांना विद्यार्थ्यांनी जिल्हा प्रमुख न्यायाधीशांच्या नावे एक निवेदन दिले.



कल्याणमधील कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील एका खासगी परीक्षा केंद्रावर रविवारी सकाळी गेल्या काही महिन्याच्या काळात तिसऱ्यांदा गोंधळ उडाला. या केंद्रावर रविवारी सकाळी १० वाजता परीक्षा होती. ही परीक्षा वेळेत सुरू होत नसल्याने केंद्राबाहेर जमलेल्या विद्यार्थी, पालकांनी गोंधळ घातला. विद्यार्थ्यांनी केंद्रात प्रवेश केल्यानंतर त्यांना निश्चित केलेल्या अनुक्रमांकाच्या संगणकासमोर बसण्याचे आवाहन करण्यात आले, त्या संगणकासमोर अगोदरच काही परीक्षार्थी बसले होते. त्यामुळे परीक्षार्थी मिळेल त्या संगणकासमोर बसले. परीक्षा उशिरा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळाला नाही. परीक्षा गैरव्यवस्थापनामुळे सकाळच्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी केंद्रातून बाहेर पडले नाहीत. त्यानंतरच्या दोन सत्रांमधील विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा देता आली नाही. सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत कल्याण केंद्रावर गोंधळ सुरू होता. न्यायालयाशी संबंधित वरिष्ठ परीक्षा केंद्राच्या ठिकाणी दाखल झाले होते. कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांनीही परीक्षा केंद्राच्या ठिकाणी भेट दिली. कल्याण केंद्रावर रायगड, नाशिक, मुंबई, पालघर जिल्ह्यातून विद्यार्थी आले होते. काही विद्यार्थी परीक्षा न देताच निघून गेले. या परीक्षेसाठी एक हजार रुपये शुल्क होते. या परीक्षेसंदर्भात परीक्षा केंद्राच्या नियंत्रकाला अनेक वेळा संपर्क केला, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

१३ हजार विद्यार्थी : मुंबई उच्च न्यायालयाअंतर्गत नागपूर, औरंगाबाद खंडपीठातील (बीएचसी-बॉम्बे हायकोर्ट) तेराशे पदांसाठी १३ हजार विद्यार्थी पात्र ठरले होते.

सकाळ, दुपार व सायंकाळ, अशा तीन सत्रांत ही परीक्षा पार पडली. यातील सकाळी १० ते ११.१५ या सत्रातील परीक्षेत हा गोंधळ उडाला. छत्रपती संभाजीनगरमध्ये २९०० विद्यार्थी वेगवेगळ्या केंद्रांवर दाखल झाले होते.



## थोडक्यात पण महत्वाचे



### महापे वाहतूक विभागाकडून चालक बांधवांसाठी आरोग्य तपासणी शिबिर!

नवी मुंबई (स. गांवकरी) : १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी मुंबईतील महापे वाहतूक विभागाच्या वतीने चालक बांधवांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा हजारो चालक बांधवांनी लाभ घेतला. चालकांच्या आरोग्याची काळजी घेत वाहतूक विभागाने राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण, दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे, अब्बू कुरेशी, अंकुश चांदणे तसेच महापे वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून चालक बांधवांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासोबतच वाहतूक सुरक्षेचा संदेश देण्यात आला. चालकांचे आरोग्य उत्तम राहणे हे सुरक्षित वाहतुकीसाठी महत्त्वाचे असल्याने अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे उपस्थितांनी सांगितले.



### आळेफाटा पोलीस स्टेशन येथे देशभक्तीपूर्ण वातावरणात ध्वजारोहण संपन्न

आळेफाटा (स. गांवकरी) : जुन्नर -देशाच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आळेफाटा पोलीस स्टेशन येथे आज सकाळी ७:३० वाजता उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विश्वास जाधव साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी व मान्यवरांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली आणि राष्ट्रगीत गायन केले. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक तसेच सर्व पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर देशाच्या शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पोलीस निरीक्षकांनी यावेळी उपस्थितांना संबोधित करताना कायद्याचे पालन, जनतेच्या सुरक्षेसाठी पोलीस दलाची असलेली जबाबदारी आणि नागरिक व पोलीस यांच्यातील समन्वय यावर भर दिला. तसेच देशसेवेसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची शपथ सर्वांनी घेतली.



### स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून २७८ विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप

पालघर (स. गांवकरी) : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ग्रुप ग्रामपंचायत कारेगाव-कोचाळे अंतर्गत येणाऱ्या तिन्ही शाळांमधील २७८ विद्यार्थ्यांना शाळोपयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. लिंगायत संघर्ष समिती व लिंगायत फाउंडेशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक उपक्रम जिल्हा परिषद आयएसओ शाळा, कोचाळे येथे उत्साहात पार पडला. ग्रुप ग्रामपंचायत कारेगाव-कोचाळेचे सरपंच मुरलीधर कडू व त्यांचे बंधू वैभव कडू यांच्या प्रयत्नातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल, कंपास पेटी, पाण्याची बाटली आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला लिंगायत फाउंडेशनचे संस्थापक अनंत ददणे, लिंगायत संघर्ष समितीचे अध्यक्ष संदीप झारेकर, चिटणीस सुधीरजी भुसारे, समितीचे सदस्य तसेच मोखाडा तालुक्याचे माजी सभापती प्रदीप वाघ, किनिस्ते गावचे सरपंच योगेश दाते, सदस्य हनुमंत फसाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कोचाळे शाळेचे मुख्याध्यापक दिनकर फसाळे व शिक्षक राजाराम जोशी यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

### शेठ टी. जे. हायस्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा!



अकोले (स. गांवकरी) : शेठ टी. जे. एज्युकेशन सोसायटी संचालित शेठ त्रिभुवनदास जमनादास हायस्कूल, शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला कनिष्ठ वाणिज्य महाविद्यालय, शेठ जयंतीलाल त्रिभुवनदास ठाणावाला कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तसेच शेठ एन. के. टी. इंग्रजी माध्यम शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीताचे गायन झाल्याने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला. यावेळी संस्थेचे सचिव श्री. नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, श्री. जसुभाई डाभी, श्री. रामजीभाई पटेल, श्री. मयुर कापडिया, श्री. राजेंद्र पुराणि, महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप पाटील, शेठ टी. जे. हायस्कूल व एन. के. टी. कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती मनीषाबेन ठक्कर, शेठ एन. के. टी. इंग्रजी माध्यम शाळेच्या प्राचार्या श्रीमती लिडिया सालियन, संस्थेचे विश्वस्त, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. अध्यक्ष नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्वातंत्र्य हे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, बलिदान आणि संघर्षाचे अमूल्य फलित असल्याचे सांगितले. देशाची एकता, अखंडता व प्रगतीसाठी योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत शिस्त, संस्कार, राष्ट्रप्रेम व कर्तव्यनिष्ठा आत्मसात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# मुक्ती पर्वाचे भव्य आळेफाटा पुणे येथे आयोजन

## 'मनाच्या बंधनांतून मुक्त होणे हीच खरी मुक्ती'- निरंकारी सत्गुरू माता सुदीक्षा जी महाराज

आळेफाटा-पुणे : (स. गांवकरी)

संपूर्ण भारत स्वातंत्र्यदिन, राष्ट्रभक्ती, अभिमान आणि उत्साहाने साजरा करीत असताना संत निरंकारी मिशनच्या वतीने या ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून ब्रह्मज्ञानातून प्राप्त होणाऱ्या अंतर्मनाच्या स्वातंत्र्याचा दिव्य संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यात आला. बाह्य बंधनांतून मुक्त होणे म्हणजेच खरी मुक्ती नव्हे; अज्ञान, अहंकार आणि भेदभाव यांपासून मुक्त होऊन आत्मबोध आणि परमात्मबोधाची अनुभूती घेणे, यातच खरी मुक्ती सामावलेली आहे, हा संदेश या पर्वातून अधोरेखित करण्यात आला.




मुक्ती पर्वाचा हा पावन समागम ,परम श्रद्धेय सत्गुरू माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन सान्निध्यात दिल्ली येथील निरंकारी सरोवरासमोरील ग्राउंड क्रमांक २, निरंकारी चौक, बुराडी रोड येथे श्रद्धा, भक्ती आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. त्याच बरोबर घोडेगाव, जुन्नर, मंचर, नारायणगाव, निरगुडसर सह स्थानिक ब्रांच च्या वतीने आळेफाटा (पुणे) येथील संत निरंकारी सत्संग भवन मध्ये या निमित्त विशेष निरंकारी सत्संग समारोह देखील संपन्न झाला. विदेशातील व्यापक कल्याणकारी प्रचार यात्रेच्या यशस्वी समारोपानंतर ,प्रदीर्घ कालावधीनंतर सत्गुरूंचे पावन दर्शन लाभल्याने दिल्ली-एनसीआरसह विविध भागांतून आलेले हजारो श्रद्धाळू भक्त भावविभोर झाले. या प्रसंगी श्रद्धाळूंना संबोधित करताना सत्गुरू माता सुदीक्षा जी महाराज यांनी सांगितले की, खरी मुक्ती बाह्य बंधनांतून नव्हे, तर द्वेष, अहंकार, संकुचित विचारसरणी आणि पूर्वग्रह यांपासून मुक्त होण्यात आहे. प्रत्येक श्वासात निराकार परमात्म्याची अनुभूती ठेवून प्रेम, भक्ती आणि स्वीकारभावाने जीवन जगणे म्हणजेच जीवनात असतानाच मुक्तीचा अनुभव घेणे होय. सत्गुरू माताजी यांनी माता सविंदरजी यांच्या जीवनातून प्रेरणा घेत 'दीपस्तंभा'चे उदाहरण देत सांगितले की, परिस्थिती कोणतीही असो, अंतर्मनातील शांतता, प्रेम आणि सकारात्मकतेचा प्रकाश सदैव तेवत ठेवला पाहिजे. संतांच्या शिकवणी केवळ ऐकणे नव्हे, तर त्यांचे विचार, आचरण करने आणि जीवनात प्रत्यक्ष अवलंब करणे, हीच खरी साधना आणि मुक्तीचा मार्ग आहे. या पावन सत्संगात श्रद्धाळू भक्तांनी मानवतेला मुक्तीच्या मार्गावर अग्रेसर करणाऱ्या महान संत विभूतींना श्रद्धापूर्वक नमन करून श्रद्धासुमने अर्पण केली. तसेच जगभरातील मिशनच्या विविध शाखांमध्येही 'मुक्ती पर्वा'निमित्त विशेष सत्संगाचे आयोजन करून या महान संत विभूतींचे श्रद्धापूर्वक स्मरण करण्यात आले. उल्लेखनीय म्हणजे, 'मुक्ती पर्वा'ची सुरुवात १९६४ मध्ये जगत माता बुद्धवंती जी यांच्या पावन स्मृतिप्रीत्यर्थ झाली. १९६९ मध्ये शहनशाह बाबा अवतार सिंह जी यांच्या ब्रह्मलीन होण्यानंतर हा दिवस 'शहनशाह-जगत माता दिवस' म्हणून श्रद्धापूर्वक साजरा केला जाऊ लागला. पुढे १९७९ मध्ये संत निरंकारी मंडळाचे प्रथम प्रधान संत लाभ सिंहजी यांच्या स्मृतीचाही या दिवसाशी संबंध जोडण्यात आला तदोपरांत बाबा गुरबचन सिंहजी यांनी या दिवसाला 'मुक्ती पर्व' म्हणून प्रतिष्ठित केले. या प्रसंगी निरंकारी राजमाताजी यांच्या भक्तिमय जीवनाचा तसेच त्यांनी दिलेल्या अमूल्य शिकवणींचाही उल्लेख करण्यात आला. २०१८ पासून युगनिर्माता माता सविंदरजी यांनाही या प्रसंगी श्रद्धापूर्वक नमन करण्यात येते. वात्सल्य, विनम्रता, त्याग आणि निःस्वार्थ सेवेने परिपूर्ण असलेले त्यांचे जीवन श्रद्धाळू भक्तांसाठी सदैव प्रेरणा, मार्गदर्शन आणि आध्यात्मिक ऊर्जेचा स्रोत राहील. तसेच सत्गुरू माता जी यांनी हा पावन दिवस मिशन आणि मानवतेच्या सेवेसाठी तन, मन आणि जीवन निःस्वार्थ भावनेने समर्पित करणाऱ्या सर्व अनन्य भक्त आणि समर्पित सेवादारांप्रति कृतज्ञता व श्रद्धा व्यक्त करण्याचे एक सशक्त माध्यम बनविले.

## इंस्टाग्रामवरील ऑनलाइन शॉपिंगच्या नावाने फसवणूक

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यात सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आणि ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या समाजकंटकांविरोधात पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत NCCRP पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारीच्या आधारे वघई पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता-2023 कलम 318(4) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम 66(D) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या बहिणीला इंस्टाग्रामवर एका अनोळखी आयडीवरून कपडे व ड्रेसच्या आकर्षक आणि लुभावणाऱ्या जाहिराती दिसल्या. ऑनलाइन ड्रेस पाठवून देण्याचे आश्वासन देत आरोपीने तक्रारदार व त्यांच्या बहिणीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपीने वेगवेगळ्या UPI स्कॅनर आणि बँक खात्यांमध्ये तब्बल 27 हजार 200 रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करून घेतले. मात्र पैसे



मिळाल्यानंतर आरोपीने ड्रेसची डिलिव्हरी केली नाही आणि ऑनलाइन फसवणूक केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वघई पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, बँक व्यवहारांची माहिती आणि मानवी माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान या सायबर फसवणुकीमध्ये मनोज मनोहर मोरे, रा. रूम नं. 01, जुना आग्रा रोड, गोकुळनगर, पश्चिम ठाणे, बजरंग जिमखाना परिसर, ठाणे, महाराष्ट्र याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

## बोरिवलीत ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील बोरिवली येथे भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी बोरिवली ग्रामपंचायतीचे प्रशासक अन्वर पिंजारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.



सामाजिक कार्यकर्ते सोहराब गुजर, सामाजिक कार्यकर्ते जियाद गुजर तसेच बोरिवली ग्रामपंचायतीच्या वतीने बोरिवली येथील गुजर हॉल येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने संपूर्ण बोरिवली गाव देशभक्तीमय वातावरणाने भारावून गेले होते. या कार्यक्रमाला बोरिवली ग्रामपंचायतीचे प्रशासक अन्वर पिंजारी, ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव, प्रमुख पाहुणे म्हणून पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी, पोलीस उपनिरीक्षक शरद सुरलकर,

मीनाक्षी फाउंडेशनचे अध्यक्ष विष्णू चंदे, माजी पंचायत समिती सदस्य मुशीर नाचण, भिवंडी काँग्रेस ग्रामीणचे माजी अध्यक्ष शरद ठाकरे, उद्योजक साजिद खोत यांच्यासह बोरिवली ग्रामपंचायतीचे सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

बोरिवली येथील विविध ठिकाणी घरांवर तसेच रस्त्याच्या दुतर्फा तिरंगे झेंडे लावण्यात आले होते. यावेळी बोरिवली ग्रामपंचायतीच्या हद्दीतील एकूण आठ शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या चित्रकला स्पर्धेमध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी बोरिवली येथील बीएलओंनी मतदार यादीशी संबंधित कामकाजात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, समूहगीते तसेच नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांना देखील सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

क्रिएटिव्ह इंग्लिश स्कूल, बोरिवली-पडघा, के.एम.ई.एस. हायस्कूल, पडघा-बोरिवली, जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा, बोरिवली-पडघा, इक्रा इस्लामिक स्कूल व मकतब, पडघा उर्दू हायस्कूल (सेमी इंग्लिश), बी.एस.ए. इंग्लिश मीडियम स्कूल, जिल्हा परिषद मराठी शाळा आनंदनगर आणि जिल्हा परिषद मराठी शाळा समतानगर या शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणाला उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान देशभक्ती, एकता आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना प्रकर्षाने दिसून आली. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वातंत्र्यदिनाचा आनंद द्विगुणित केला. विद्यार्थ्यांचा उत्साह, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांचा सन्मान, बीएलओंचा गौरव आणि नागरिकांची मोठी उपस्थिती यामुळे बोरिवलीतील स्वातंत्र्यदिन सोहळा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

## मोबएव्हेन्यू एआय टेकच्या महसुलात ५६.९ टक्के वाढ

मुंबई : (स. गांवकरी)

मोबएव्हेन्यू एआय टेक लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीचा महसूल ५६.९ टक्क्यांनी वाढून ७२.८ कोटी रुपये झाला. करानंतरचा नफा जवळपास दुप्पट होऊन ११.७ कोटी रुपयांवर पोहोचला, तर व्याज, कर, घसारा आणि कर्जखर्चापूर्वीचा नफा ७७ टक्क्यांनी वाढून १५.४ कोटी रुपये झाला. या नफ्याचे प्रमाण २१.२ टक्के राहिले.



महसुलाच्या तुलनेत नफ्यात अधिक वेगाने वाढ झाल्याने कंपनीच्या कार्यक्षमतेत सुधारणा झाल्याचे दिसून आले. सॉफ्टवेअरवर आधारित व्यवसाय पद्धतीमुळे खर्चात त्याच प्रमाणात वाढ न करता व्यवसायाचा विस्तार करणे कंपनीला शक्य झाले. क्विक कॉमर्स, बँकिंग-वित्तीय सेवा-विमा, वित्तीय तंत्रज्ञान आणि किरकोळ विक्री यांसारख्या वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांतील थेट जाहिरातदारांकडून मिळालेली मागणी तसेच पुनर्विक्रेता आणि जाहिरात संस्थांच्या माध्यमातून मिळालेले जागतिक ग्राहक ही कंपनीच्या वाढीची प्रमुख कारणे ठरली. एकूण महसुलात थेट ग्राहकांचा वाटा ६५.२ टक्के राहिला.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील महसुलाचा वाटा २०.७ टक्क्यांवर पोहोचला असून, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये तो ११.५ टक्के होता. भारताचा महसुलातील वाटा ७९.३ टक्के राहिला. डेटा आणि कार्यकारी खर्चाच्या तुलनेत महसूल अधिक वेगाने वाढल्याने नफा आणि कार्यकारी नफ्याच्या प्रमाणात सुधारणा झाली. मागील तिमाहीच्या तुलनेत कार्यकारी नफ्याचे प्रमाण २१.२ टक्क्यांवर स्थिर राहिले, तर करानंतरच्या नफ्याचे प्रमाण २७० आधारबिंदूंनी वाढून १६.१ टक्के झाले. इतर उत्पन्नात झालेल्या २.२ कोटी रुपयांच्या वाढीचाही यामध्ये हातभार लागला. कंपनीने या तिमाहीत 'मोबएव्हेन्यू न्यूरल इंजिन' हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान सुरू केले. जाहिरात नियोजन, अंमलबजावणी, सर्जनशील निर्मिती आणि अहवाल तयार करण्यापासून संपूर्ण जाहिरात प्रक्रियेत हे तंत्रज्ञान कार्य करणार आहे.

यामुळे जाहिरातदारांना ५९ सेकंदांपेक्षा कमी वेळेत जाहिरात मोहिमेच्या नियोजनापासून ती प्रत्यक्ष सुरू करण्यापर्यंतची प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. आगामी तिमाहींमध्ये हे तंत्रज्ञान कंपनीच्या व्यासपीठात टप्प्याटप्प्याने समाविष्ट केले जाणार आहे. कंपनीच्या जनजागृती, ग्राहक संपादन आणि ग्राहक सक्रियता या त्रिसूत्रीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून निर्णयक्षमता आणि परिणामकारकता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

मोबएव्हेन्यूने स्वतःचे तंत्रज्ञान व्यासपीठ विकसित केले असून, त्यासाठी बाह्य जाहिरात व्यासपीठांवर अवलंबून राहावे लागत नाही. कंपनीची कृत्रिम बुद्धिमत्ता व्यवस्था दररोज १३० कोटींपेक्षा अधिक संमती-आधारित ग्राहक आणि जाहिरात मोहिमांशी संबंधित संकेतांवर प्रक्रिया करते. प्रत्येक जाहिरात बोलीचा निर्णय १५ मिलीसेकंदांपेक्षा कमी वेळेत घेतला जातो. §§कंपनीची कृत्रिम बुद्धिमत्ता प्रारूपे ५० टेराबाइटपेक्षा अधिक वर्तनात्मक आणि संदर्भाधारित माहितीवर सुमारे एका तासात पुन्हा प्रशिक्षित केली जातात. यापूर्वी याच प्रक्रियेला १० ते १२ तास लागत होते.

## पाच वर्षांनंतर जऊळके खुर्दला एसटी सेवा सुरू



जऊळके खुर्द : (स. गांवकरी)

राजगुरुनगर ते जऊळके खुर्द, टाकळकरवाडी व थिटेवाडी मार्गावरील एसटी बससेवा तब्बल पाच वर्षांनंतर १५ जुलै २०२६ रोजी पुन्हा सुरू झाली. विधान भवनचे स्वयं सहाय्यक सचिव श्री. राजेंद्र विठ्ठल खंडीझोड यांच्या हस्ते बससेवेचे उद्घाटन करण्यात आले. पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते श्री. कांतीराम बोऱ्हाडे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही बससेवा सुरू झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यावेळी महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एसटी बसचे पूजन केले. कार्यक्रमास ग्रामपंचायत प्रशासक श्री. विजय खेडेकर, ग्रामसेवक सौ. माधुरी गोसावी, सरपंच, उपसरपंच, तरुण बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते. एसटी आगार व्यवस्थापक सौ. विद्या कदम, सहाय्यक वाहतूक अधीक्षक श्री. विनोद वरेकर, स्थानक प्रमुख श्री. तुकाराम पवळे, वाहतूक नियंत्रक मनीषा कोळेकर तसेच चालक-वाहकांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात आले.

# आईकू जेड ११ विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा नवा अनुभव देणार

## ४० हजार रुपयांपेक्षा कमी किमतीच्या वर्गात २० ऑगस्टला होणार दाखल; अभ्यास, टिपणे, निर्मिती आणि बहुकामासाठी उपयुक्त

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

उच्च कार्यक्षमतेच्या स्मार्टफोनसाठी ओळखल्या जाणाऱ्या आईकू कंपनीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून आपला नवीन आईकू जेड ११ स्मार्टफोन सादर करण्याची घोषणा केली आहे. हा स्मार्टफोन २० ऑगस्ट रोजी भारतीय बाजारपेठेत दाखल होणार असून, त्याची किंमत ४० हजार रुपयांपेक्षा कमी असणार आहे.

अभ्यास, टिपणे तयार करणे, मजकूर निर्मिती, माहिती शोधणे आणि एकाच वेळी अनेक कामे करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा स्मार्टफोन विशेषतः तयार करण्यात




आला आहे. अधिक वेगवान आणि अधिक हुशार कृत्रिम बुद्धिमत्तेचा अनुभव देण्याच्या उद्देशाने त्याची रचना करण्यात आली आहे.

आईकू जेड ११ मध्ये विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन अनेक कृत्रिम बुद्धिमत्ता सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यातील 'एआय कॅप्शन्स' सुविधा गूगल जेमिनी आणि मायक्रोसॉफ्ट अझूर या तंत्रज्ञानांना एकत्रित करून जलद आणि अचूक ध्वनीचे लिखित रूपांतर तसेच भाषांतर करण्यास मदत करते. वर्गातील व्याख्याने, कार्यशाळा आणि चर्चांदरम्यान बोलण्याची पद्धत, लय, महत्त्वाचे मुद्दे आणि उच्चार समजून घेऊन त्यातील आवश्यक माहिती टिपण्यास ही सुविधा मदत करणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नंतर अभ्यास करताना महत्त्वाचे मुद्दे पुन्हा पाहणे सोपे होणार आहे.

'एआय क्रिएशन' सुविधेच्या माध्यमातून मोठ्या दस्तऐवजांचा संक्षेप तयार करणे, अभ्यासक्रमाशी संबंधित कामात सुधारणा करणे, नव्या कल्पना सुचवणे आणि मजकूर तयार करणे शक्य होणार आहे.

प्रत्यक्ष वेळेतील प्रवाहाधारित कृत्रिम बुद्धिमत्ता रचनेमुळे ध्वनीचे लिखित रूपांतर आणि भाषांतर जलद गतीने करता येणार आहे. संभाषणक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता सुविधेमुळे आधीची माहिती पुन्हा सुरुवातीपासून देण्याची गरज न पडता पुढील प्रश्न किंवा सूचना देऊन तयार झालेला मजकूर अधिक चांगला करता येणार आहे.

'सर्कल-टू-सर्च' सुविधेसह या सर्व तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना जलद माहिती शोधणे, अनेक भाषांमध्ये संवाद साधणे, स्वतःचा मजकूर तयार करणे आणि त्यात सुधारणा करणे अधिक सोपे होणार आहे.

आईकू जेड ११ हा भारतातील मीडियाटेक डायमेंसिटी ७५०० टर्बो प्रक्रियकावर आधारित पहिला स्मार्टफोन असल्याचा कंपनीचा दावा आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी स्वतंत्र हार्डवेअर देण्यात आले असून, मागील पिढीच्या तुलनेत कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यक्षमतेत दुप्पट सुधारणा झाल्याचे कंपनीने म्हटले आहे. यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुविधा अधिक वेगाने आणि प्रतिसादक्षम पद्धतीने कार्य करतील.

स्मार्टफोनमध्ये त्रिमितीय वक्राकार एमोलेड पडदा देण्यात आला असून, या किमतीच्या वर्गातील सर्वाधिक उजळ पडदा असल्याचा कंपनीचा दावा आहे. ऑनलाइन शिक्षण, चित्रफिती पाहणे आणि मनोरंजनासाठी हा पडदा अधिक चांगला अनुभव देणार आहे.

### प्रत्येक कामासाठी योग्य कृत्रिम बुद्धिमत्ता

कौशल्याधारित कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शन तंत्रज्ञानामुळे लेखन, संक्षेप, विचारमंथन आणि सामान्य मजकूर निर्मिती अशा विविध कामांसाठी योग्य कृत्रिम बुद्धिमत्ता प्रारूपाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक कामासाठी अधिक परिणामकारक प्रतिसाद मिळण्यास मदत होणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



ठाणे - भारतीय जनता पार्टी ठाणे जिल्हा अनु. जाती जिल्हा सरचिटणीस व टायगर ग्रुप ठाणे जिल्हा अध्यक्ष मा. सतीश केळशीकर यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून दिवा पश्चिम येथे गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप वाटप करण्यात आले. प्रसंगी दिवा भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## सेंट स्टीव कॉन्व्हेंट स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिनाचा जल्लोष



कोपरखैरणे (स. गांवकरी) : सेंट स्टीव कॉन्व्हेंट स्कूल, कोपरखैरणे येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भव्य रॅली व परेडनंतर ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि ध्वजगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, नृत्य, गीते आणि नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषण, नववीच्या विद्यार्थ्यांचे 'ऐ वतन' गीत, तसेच 'हे राष्ट्र देवाचे' आणि 'तिरंगा' या गीतांनी कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले लेझीम प्रदर्शन विशेष आकर्षण ठरले. विद्यार्थिनी मैत्रेयी हिने मराठी भाषणातून स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार व शाल वितरण करण्यात आले. शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे शाळा व्यवस्थापनाने कौतुक केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## चाडेगाव येथे 'टायगर ग्रुप' कडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

चाडेगाव (स. गांवकरी) : देशाच्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी चाडेगाव येथील शाळा क्रमांक ५४ मध्ये 'टायगर ग्रुप'च्या वतीने विद्यार्थ्यांसाठी एका अत्यंत स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी आणि त्यांना अभ्यासासाठी अधिक प्रोत्साहन मिळावे, या उदात्त हेतूने विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. उपक्रमाचे आयोजन टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी जाधव यांच्या निर्देशानुसार करण्यात आले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची ओढ कायम राहावी आणि त्यांना योग्य ती शैक्षणिक मदत मिळावी, यासाठी टायगर ग्रुप नेहमीच अग्रेसर असतो. नाशिक जिल्ह्यात सचिन जाधव यांच्या यांच्या मार्फत वर्षभर टायगर ग्रुपचे विविध उपक्रम पार पडतात. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून, टायगर ग्रुपचे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष जाधव यांच्या हस्ते शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांना वह्या आणि इतर आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहात मिळालेली ही अभ्यासाची नवी शिदोरी हातात पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक निरागस आनंद पाहायला मिळाला. या उपक्रमातून टायगर ग्रुपने तरुणाईच्या ताकदीचा विधायक कार्यासाठी वापर करत समाजासमोर एक चांगला आदर्श ठेवला आहे. समाजातील संस्थांनी पुढे येऊन विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहिल्यास मुलांचा शाळेतील उत्साह निश्चितच दुणावतो. याच भावनेतून या स्तुत्य आणि विद्यार्थीभिमुख उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक भाग्यवान मोहिते यांनी जाधव आणि संपूर्ण टायगर ग्रुपचे शाळेच्या वतीने विशेष आभार मानले. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाप्रसंगी परिसरातील नगरसेवक, ग्रामस्थ, शिक्षक वर्ग आणि शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. केवळ पारंपरिक पद्धतीने झेंडावंदन न करता, तळागाळातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावत टायगर ग्रुपने प्रत्यक्ष कृतीतून साजरा केलेला हा स्वातंत्र्यदिन चाडेगाव परिसरात सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे.

## थोरांदळे जि.प. शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची इस्रो-नासा भेटीसाठी निवड





मंचर/पुणे (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. अंतराळ संशोधन संस्था व आयुका, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या इस्रो-नासा भेट निवड चाचणीत शाळेतील दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. इयत्ता सातवीतील आयुष नितीन फुटाणे याची नासा भेटीसाठी, तर स्तवन सचिन तोडकर याची इस्रो भेटीसाठी निवड झाली. विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ संशोधन व विज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना अंतराळ संशोधनाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने ही निवड चाचणी घेण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. या यशासाठी मार्गदर्शक शिक्षक संदीप बबन शिंदे व अनिकेत आवटे तसेच मुख्याध्यापक हेमराज जयराम भदाणे यांचे मार्गदर्शन लाभले. आयुष व स्तवन यांच्या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवी ओळख मिळाली असून, त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# शेतकऱ्याच्या मुलीची एम पी एस सी परीक्षेत दोन पदांसाठी निवड



> एमपीएससी परीक्षा पास होणे हे केवळ नशिबाने शक्य झाले नसून अभ्यास चिकाटी आणि संयम यामुळे मी अशक्य गोष्ट शक्य केली आहे अशी प्रतिक्रिया तिने दिली व तिच्या यशाचे श्रेय आई-वडिलांच्या चरणी अर्पण केले पुढील भावी आयुष्यात प्रशासकीय सेवेत खूप चांगल्या प्रकारे काम करण्याचा मनोदय तिने व्यक्त केला. - हर्षदा कुर्ले

मुरबाड : (स. गांवकरी)

सेक्युरिटी गार्डची नोकरी करणाऱ्या एका शेतकऱ्याचे मुलीची एम पी एस सी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत दोन पदांसाठी निवड झाली आहे हर्षदा रमेश कुर्ले असे तिचे नाव आहे तिची दुय्यम निबंधक श्रेणी 1 व राज्य कर निरीक्षक अशा दोन पदांसाठी निवड झाली आहे मुरबाड तालुक्यातील कान्होळ गावांमधील रहिवासी असलेले तिचे वडील रमेश कुर्ले अंबरनाथ येथील अलाईड कंपनीत सेक्युरिटी गार्ड म्हणून काम करत आहेत. एमपीएससी परीक्षेमध्ये दोन पदांसाठी निवड झाल्याबद्दल कान्होळ परिसरातील ग्रामस्थांनी रविवारी 16 ऑगस्ट रोजी कान्होळ ते म्हसा गावापर्यंत भव्य मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला महिलांनी ठिकठिकाणी तिचे औक्षण करून स्वागत केले हर्षदा हीचे प्राथमिक शिक्षण कान्होळ गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत, माध्यमिक शिक्षण वीर भाई कोतवाल हायस्कूल म्हसा येथे तर बारावी व नंतर पदवी पर्यंत शिक्षण जनसेवा शिक्षण मंडळ संचलित शिवळे महाविद्यालय येथे झाले आई गृहिणी तर वडील साधे सेक्युरिटी गार्ड अशी कुटुंबाची परिस्थिती आहे

तिने इयत्ता बारावी मध्ये असताना एमपीएससी परीक्षा देण्याचे स्वप्न पाहिले होते त्या दृष्टीने घरी राहून तिने तयारी केली दीपस्तंभ मनोबल फाउंडेशन जळगाव यांची शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण करून तिने शिष्यवृत्ती मिळवली व जळगाव येथे निवासी कार्यशाळेत तयारी केली दोन वर्षे जळगाव येथे तयारी आणि अभ्यास केल्यानंतर 2023 मध्ये ती पोलीस उपनिरीक्षक पदाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरली परंतु या पदाच्या मैदानी चाचणीच्या परीक्षेत अवघ्या एका सेकंदाने धावण्याच्या चाचणीत मागे पडली या पदासाठी ती अपात्र ठरली परंतु अपयशाने खचून न जाता तिने पुन्हा 2025 साली परीक्षेची तयारी केली व त्याच वर्षी तिची महिला व बाल विकास विभागा अंतर्गत संरक्षण अधिकारी या पदासाठी निवड झाली परंतु तिने एम पी एस सी च्या मुख्य परीक्षेची तयारी सुरू ठेवली व अखेर नुकताच एमपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला त्यामध्ये दुय्यम निबंधक श्रेणी एक व राज्य कर निरीक्षक या दोन पदासाठी ती पात्र ठरली आहे तिच्या या उज्वल यशाबद्दल परिसरातील गावच्या ग्रामस्थांनी कान्होळ ते म्हसा नाक्या पर्यंत रविवारी सकाळी हर्षला व तिच्या आई-वडिलांची मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला व तिचे कौतुक केले. मुरबाड तालुक्यातील कान्होळ येथील हर्षदा कुरले या विद्यार्थिनीने एम पी एस सी परीक्षेत दुय्यम निबंधक श्रेणी एक व राज्य कर निरीक्षक या पदाची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल ग्रामस्थांनी तिची मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला.

## ओतूर येथे ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे शनिवार (दि. १५ ऑगस्ट) रोजी ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन विविध शैक्षणिक संस्था व ग्रामपंचायतीच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. ओतूर ग्रामपंचायत कार्यालय, पांढरी मारुती चौक, चैतन्य विद्यालय, गाडगे महाराज विद्यालय, सावित्रीबाई फुले विद्यालय, पोलिस स्टेशन आदी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीत, कविता तसेच सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून विद्यार्थ्यांना देशाच्या प्रगतीत योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, मोहित ढमाले, तुषार थोरात, अनिलशेठ तांबे, ग्रामसेवक बाळासाहेब वनघेरे



धनंजय डुबरे,जय बजरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल डुंबरे, छबुराव तांबे, बाळासाहेब घुले, बाळासाहेब वारुळे,, सुभाष तांबे, विलास जाधव, राजू फापाळे, ॲड. संजय शेटे, जया डुंबरे, जयश्री तांबे, प्रशांत डुबरे, विनायक तांबेरंजना घोलप तसेच पोलिस प्रशासन, शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण ओतूर परिसरात स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## स्वातंत्र्य दिन उत्साहात; ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळेत ध्वजारोहण



### कै. प्रदीप जगताप यांना अभिवादन

> गोगांवचे माजी सरपंच तथा भाजपा तालुका उपाध्यक्ष कै. प्रदीप जगताप यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेल्या कार्याची यावेळी उपस्थितांनी आठवण करून दिली. गावाच्या विकासासाठी त्यांनी केलेले योगदान तसेच सामाजिक क्षेत्रातील त्यांची भूमिका याबाबत माहिती सांगून ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळा या दोन्ही ठिकाणी त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

अक्कलकोट : (स. गांवकरी)

स्वातंत्र्य दिनानिमित्त गोगांव ग्रामपंचायत तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोगांव येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. देशभक्तीपूर्ण वातावरणात ध्वजारोहण, राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन आणि अभिवादन कार्यक्रम पार पडले. यावेळी गोगांवचे माजी सरपंच तथा भाजपा तालुका उपाध्यक्ष कै. प्रदीप जगताप यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची आठवण करून देत त्यांना अभिवादन करण्यात आले.

गोगांव ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सूर्यकांत जिरगे होते. यावेळी सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण बिराजदार, ग्रामपंचायत अधिकारी विक्रम घाटे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन डॉ. लिंगराज नडगेरी व अनिल मुलगे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ध्वजकट्टा पूजन शरणपा कलशेट्टी यांनी केले. स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगताना देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि संविधानिक मूल्यांचे जतन करण्याची गरज यावर उपस्थितांनी विचार व्यक्त केले.

यानंतर जिल्हा परिषद शाळा, गोगांव येथेही स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. वनिता सुरवसे होत्या. प्रतिमापूजन पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरणपा मुळजे यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजकट्टा पूजन सुधाकर सुरवसे यांनी केले, तर ध्वजारोहण ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, मुख्याध्यापक पुंडलिक वाघमारे, आशा भोसले यांच्यासह शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शंकर कारभारी सर यांनी मानले.

## तिरंगा फडकला, देशभक्ती जागी झाली!

### अल्फाज् ॲकॅडमीत ८० व्या स्वातंत्र्य दिनाला मानाचा मुजरा



- विद्यार्थ्यांच्या घोघोषाने दुमदुमला परिसर: अल्फाज् ॲकॅडमीत स्वातंत्र्याचा उत्सव देशभक्तीच्या रंगात

कनाशी : (स. गांवकरी)

देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन अभोना येथील नामांकित अल्फाज् ॲकॅडमी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये देशभक्ती आणि शिस्तीच्या अनोख्या संगमात साजरा करण्यात आला. संपूर्ण परिसर तिरंग्याच्या रंगांनी नटला होता आणि विद्यार्थ्यांच्या वंदे मातरम्! भारत माता की जय! च्या घोषणांनी अवघा आसमंत दुमदुमून गेला.

या ऐतिहासिक सोहळ्यासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, सक्रिय आंदोलक आणि थोर गांधीवादी विचारवंत मान्यवर श्री. के. के. गांगुर्डे सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यानंतर संपूर्ण शाळेने एका आवाजात राष्ट्रगीत गायले.

ध्वजारोहणानंतर बोलताना गांगुर्डे सरांनी आपल्या ओघवत्या भाषणातून विद्यार्थ्यांना देशासाठी झटणाऱ्या युवकांचे उदाहरण दिले. शिक्षक म्हणजे केवळ पगार घेणारे नाहीत, तर ते देशाचे भविष्य घडवणारे शिल्पकार आहेत असे सांगत त्यांनी शिक्षकांच्या कार्याला सलाम केला. त्यांचे विचार ऐकून विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाची ज्योत अधिक तेवली. स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेतील इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणे सादर केली. या भाषणांमधून त्यांनी देशासाठी बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांच्या त्यागाला उजाळा दिला. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्त आणि देशप्रेम पाहून उपस्थित पालक आणि ग्रामस्थ थक्क झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षिका पूनम शेवाळे यांनी केले. शेवटी मुख्याध्यापिका विभावरी पाडळे यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक विवेक पाडळे सर मुख्याध्यापिका विभावरी पाडळे मॅडम पर्यवेक्षिका पूनम शेवाळे मॅडम मनीषा देशाई, प्रीती गांगुर्डे व इतर मान्यवरांच्या हस्ते शाळा, श्रीफळ देऊन पाहुण्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात राष्ट्रभक्ती गीतांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना लाडू वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. ८० वर्षे स्वातंत्र्याची, आता १०० वर्षे प्रगतीची या निर्धाराने अल्फाज् ॲकॅडमीने स्वातंत्र्यदिन साजरा करत शिक्षणासोबत संस्काराचे महत्व अधोरेखित केले.

## दिवा विकास प्रतिष्ठान आयोजित भव्य महारक्तदान शिबिर संपन्न



ठाणे : (स. गांवकरी)

शिवसेना उपशहरप्रमुख व लोकप्रिय नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त दिव्यातील मुंब्रादेवी कॉलनीतील रिलायन्स शाखेत भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. दिवा विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून आयोजित सदर शिबिराचे ५ वे वर्ष असून या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला. दरवर्षी शिवसेना उपशहर प्रमुख तथा नगरसेवक शैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. सदर रक्तदान शिबिराला स्थानिक कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी उपस्थित राहून रक्तदान ही केले. तसेच या सामाजिक कार्यक्रमाचे कौतुक केले.

रिलायन्स टॉवर शिवसेना शाखा येथे आयोजित महारक्तदान शिबिरात 198 रक्तदात्यांनी रक्तदान केले. "थेंब थेंब रक्ताचा, उपक्रम समाजसेवेचा" या घोषवाक्याखाली पार पडलेल्या या शिबिरासाठी ब्लड लाईन, चॅरिटेबल ब्लड बँक, ठाणे यांचे व हरदेव हॉस्पिटल, दिवा यांचे सहकार्य लाभले.

## पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सहन करणार नाही

- डॉ. विश्वासराव आरोटे
- पत्रकार सुरेश वाणी यांना कथित धमकीप्रकरणी चौकशीची मागणी
- महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा इशारा



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील अंजनावळे येथील आश्रम शाळेत अदानी प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांची बैठक सुरू असताना आमदार शरद सोनवणे यांनी पत्रकार सुरेश वाणी यांच्याशी कथितरीत्या अर्वाच्य भाषेत वक्तव्य करून धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच पत्रकारांविषयी अवमान कारक वक्तव्य केल्याचा आरोप असून,या प्रकाराचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने तीव्र निषेध केला आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे आणि पुणे जिल्हा उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी पत्रकारांना धमकावणे अथवा दमदाटी करणे हा लोकशाहीच्याचौथ्या स्तंभावर दबाव आणण्याचा प्रकार असल्याचे सांगत, घटनेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. आमदार शरद सोनवणे यांनी कथित वक्तव्याबाबत जाहीर माफी मागून ते मागे न घेतल्या स मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री आणि संबंधित प्रशासनाकडे निवेदन देऊन राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा पत्रकार संघाने दिला आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या हक्कावर दरोडा

## राजूर प्रकल्प कार्यालयाचा मनमानी कारभार उघड?

### पत्रकारांना आश्रमशाळांमध्ये प्रवेश नाकारल्याचा आरोप

> आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या समस्या, शैक्षणिक सुविधा, भोजन व्यवस्था आणि प्रशासनाचा कारभार याबाबत वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी पत्रकारांनी वृत्तसंकलनाचा प्रयत्न केल्यास त्यांना आश्रमशाळांच्या आवारात प्रवेश नाकारला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता असणे अपेक्षित असताना पत्रकारांना प्रवेश रोखण्यामागे नेमके कारण काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध आहेत की नाहीत, याची स्वतंत्रपणे पडताळणी होणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे.

राजूर : (स. गांवकरी)

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर अंतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमांनुसार मिळणाऱ्या मूलभूत सुविधा व पोषण आहारापासून वंचित ठेवले जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना नियमानुसार बोकडाचे मटण भोजनामध्ये देणे अपेक्षित असताना, सन २०२४ ते २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांना हे भोजन पुरविण्यात आले नसल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आहारासाठी मंजूर होणाऱ्या निधीचा नेमका वापर कुठे आणि कसा झाला, असा सवाल उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचारी व पुरवठादारांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे. या प्रकरणाची माहिती मिळविण्यासाठी माहितीच्या अधिकाराअंतर्गत अर्ज करण्यात आला असता, मागण्यात आलेल्या मुद्द्यांवर स्पष्ट व थेट माहिती न देता दिशाभूल करणारी माहिती देण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांच्याकडे संबंधित बाबींविषयी माहिती मागण्यात आली होती. मात्र, बोकडाच्या मटणाबाबतच्या मुख्य प्रश्नाला बगल देत इतर नियम, संदर्भ व कारणे पुढे करून माहिती टाळण्याचा प्रयत्न झाल्याचा तक्रारदारांचा आरोप आहे. त्यामुळे माहिती अधिकार कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे बोलले जात आहे. प्रकल्प कार्यालयाच्या कारभाराविरोधात तक्रार दाखल केल्यानंतर झालेल्या सुनावणीदरम्यान तक्रारदारावर विविध प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून तक्रारदाराला दबावाखाली आणण्याचा प्रयत्न झाल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. या आरोपांचीही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी पुढे आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण, निवास आणि पोषणासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना मंजूर असलेल्या आहार योजनेची अंमलबजावणी झाली का, किती विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले, त्यासाठी किती निधी खर्च झाला आणि संबंधित पुरवठादारांना किती रक्कम अदा करण्यात आली, याचा संपूर्ण हिशेब सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे.

# कुमशेत जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

शिवनेरी : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे ८० .वा स्वातंत्र्य दिन सांस्कृतिक व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी सकाळी गावामध्ये जय जवान जय किसान .... स्वतंत्र दिनाचा विजय असो.... देशभक्तीपर घोषणा देत गावात फेरी काढली .

ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण अंगणवाडी माजी सेविका सुलोचना डोके तसेच जि. प प्रा. शाळा ध्वजारोहण शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आशितोष दिलीप डोके यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामपंचायत




सदस्य अंबादास डोके , सरपंच रवींद्र डोके, पोलीस पाटील मंगेश डोके, पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य राजेश डोके,तंटामुक्ती अध्यक्ष मंगेश भगत, उपसरपंच पद्मा शिंदे, माजी बँक अधिकारी सुभाष डोके, बबन डोके व सत्यवान डोके , संचालक रवींद्र डोके, माजी संचालक शिवाजी डोके, माजी केंद्रप्रमुख बापू डोके, शि ब्र कृ से सो संचालक संतोष डोके, माजी अध्यक्ष वसंत डोके , विकास थोरात , ओम साई सेवा मंडळ, अंगणवाडी सेविका प्रियंका डोके व हार्षेदा डोके , मदतनीस वैशाली डोके,कर्मचारी संदेश डोके यांच्यासह ग्रामस्थ , पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेला दानशूर व्यक्तीं , माजी विद्यार्थी यांनी मोलाची साथ दिली . शिवसेना सचिव महाराष्ट्र राज्य वैभव मारुती थोरात यांच्या वतीने चुलते कै. नारायण अर्जुन थोरात यांच्या स्मरणार्थ शाळेसाठी ₹२५,००० ची कायम ठेव (एफ.डी.) तसेच त्यांच्या मातोश्री कै. विमल मारुती थोरात यांच्या स्मरणार्थ शाळेला लॅपटॉप भेट देण्यात आला. माजी विद्यार्थिनी प्रियांका जतिन परदेशी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना आयडेंटिटी कार्डचे वाटप करण्यात आले. माजी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी मा. मच्छिंद्रनाथ डोके साहेब यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी मिक्सर-ग्राइंडर उपलब्ध करून देण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेतील तब्बल ३८ विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यलढा, राष्ट्रभक्ती आणि देशाच्या विकासाविषयी आपले विचार व्यक्त केले. इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य अंबादास डोके , माजी सरपंच दगडु ढोमसे , सरपंच रवींद्र डोके, माजी बँक अधिकारी सुभाष डोके, पोलीस पाटील मंगेश डोके , पत्रकार राजेश डोके आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थ्यांनी सामुदायिक सर्व कवायत सादरीकरण करून देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि सहकार्याची भावना रुजविण्याचा संदेश दिला . प्रस्ताविक व सूत्रसंचालन उपशिक्षक श्याम लालोपोड व आभार मुख्याध्यापक यश घोडे यांनी केले.



ठाणे : दिवा विकास प्रतिष्ठान आयोजित शिवसेना उपशहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील व संचित शैलेश पाटील यांच्या वाढदिवसाच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसीय भव्य आधारकार्ड शिबीर पाटील यांच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित करण्यात आले.

(फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### अविरत ग्लोबल फाउंडेशनचा वृक्षारोपण उपक्रम उत्साहात!

पुणे (स. गांवकरी) : भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अविरत ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत १५ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. आंबेगाव–नऱ्हे येथील स्वामीनारायण मंदिराच्या ट्रॅक साइड परिसरात सकाळी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फाउंडेशनचे सदस्य, हितचिंतक तसेच पर्यावरणप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत वृक्षारोपण केले. ‘पर्यावरणासाठी एक पाऊल’ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश देण्यात आला. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. आरोग्य, शिक्षण आणि वृद्धाश्रम या क्षेत्रांत कार्यरत असलेल्या अविरत ग्लोबल फाउंडेशनच्या या सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने देशसेवेसोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

### अभिनेते विकास वायाळ यांची महाराष्ट्र प्रवक्तापदी निवड



पुणे (स. गांवकरी) : दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या महाराष्ट्र प्रवक्तापदी अभिनेते विकास वायाळ यांची निवड करण्यात आली आहे. कलाकारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या या संघटनेच्या माध्यमातून देशभरातील कलाकारांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अध्यक्ष अजित महामुनकर यांनी विकास वायाळ यांची महाराष्ट्र प्रवक्तापदी निवड जाहीर केली. वायाळ यांना कलाक्षेत्राचा दांडगा अनुभव असून, त्यांच्या अनुभवाचा फायदा महाराष्ट्रातील कलाकारांना होईल, असा विश्वास अध्यक्ष अजित महामुनकर यांनी व्यक्त केला. कलाकारांच्या समस्या शासन व संबंधित यंत्रणांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विकास वायाळ यांच्या माध्यमातून संघटनेचे काम अधिक प्रभावीपणे पुढे नेले जाईल, असेही त्यांनी सांगितले. कलाक्षेत्राशी संबंधित माहिती, बातम्या तसेच विविध उपक्रमांच्या माहितीसाठी इलेक्ट्रॉनिक प्रेस मीडिया, प्रिंट मीडिया व इतर माध्यमांनी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे महाराष्ट्र प्रवक्ते अभिनेते विकास वायाळ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. श्री विकास वायाळ हे द युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे मुंबई कार्याध्यक्ष आहेत. या निवडीबद्दल दैनिक युवक आधारचे संपादक तथा दादासाहेब फाळके चित्रपट युनियन मीडिया विभागाचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. संतोष शिवदास आमले व द युवा ग्रामीण पत्रकार संघटना अखिल भारतीय अध्यक्ष अन्सार शेख साहेब व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष शकील मणियार साहेब यांनी अभिनेते विकास वायाळ यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# संस्कार, शिस्त आणि योग्य मूल्यांची शिकवण देण्याचे कार्य कौतुकास्पद- प्रथमेश कोठे

## ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, सोलापूर येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात

सोलापूर : (स. गांवकरी)

पूर्व विभागामध्ये प्ले ग्रुप पासून CBSE शिक्षणाची सुरुवात करणारी ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल ही एक महत्वाची शैक्षणिक संस्था बनत आहे. लहान मुलांना केवळ शिक्षणच नव्हे, तर चांगले संस्कार, शिस्त आणि योग्य मूल्यांची शिकवण देण्याचे कार्य शाळेमार्फत केले जात आहे. लहान वयातच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भक्कम पाया घडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शाळा करत असल्याचे मत नगरसेवक प्रथमेश दादा कोठे यांनी उपस्थित पालकाना मार्गदर्शन करताना आपल्या भाषणात आवर्जून सांगितले. ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, सोलापूर येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात, देशभक्तीच्या वातावरणात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख




पाहुणे म्हणून प्रभाग क्र. ११ चे नगरसेवक प्रथमेश दादा कोठे, संचालिका सौ. नेहा चनशेट्टी, नगरसेवक श्री. सतीश सिर्सिला, माजी सैनिक दिलीप चव्हाण आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नगरसेवक प्रथमेश दादा कोठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी एकत्रितपणे राष्ट्रगीत गायले आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणे सादर करून स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि देशाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्यांची जाणीव करून दिली. एलकेजीच्या मुलींनी ‘तिरंगा’ या गीतावर देशभक्तीपर नृत्य सादर केले, तर यूकेजीच्या मुलांनी ‘इंडिया वाले’ या गीतावर आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्लेग्रुप आणि नर्सरीच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषेत सहभागी होत ‘फ्रीडम फायटर’ या संकल्पनेवर आधारित विशेष उपक्रम सादर केला. लहानग्यांच्या या सादरीकरणामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध देशभक्तीपर कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर देशप्रेम, एकता आणि राष्ट्रीय अभिमानाने भारावून गेला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम अधिक आकर्षक आणि संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे मानसी माने यांनी मनःपूर्वक आभार मांडले.

# भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

अक्कलकोट : (स. गांवकरी)

ईद-ए-मिलादून नबी निमित्त अक्कलकोट तालुका युवक मुस्लिम समाजाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून चला रक्तदान करूया, माणुसकी जपूया! असे आवाहन मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. मागच्या वर्षी ईद-ए-मिलादून नबी निमित्त आपण आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला अक्कलकोट शहर व तालुक्यातील नागरिकांनी आणि रक्तदात्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्या रक्तदात्यांनी केलेल्या रक्तदानामुळे संपूर्ण वर्षभरात अनेक गरजू रुग्णांना वेळेवर रक्ताची पिशवी उपलब्ध करून देता आली आहे. अक्कलकोट शहर व तालुक्यातील ज्या गरजू व्यक्तींना रक्ताची आवश्यकता होती, त्यांनी आम्हाला संपर्क केल्यानंतर माणुसकीच्या नात्याने त्यांच्या गरजेप्रमाणे रक्त उपलब्ध करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला. आपले रक्त कोणासाठी तरी जीवनाची आशा बनू शकते.



आपण दिलेले रक्त एखाद्या आईला तिचे लेकरू, एखाद्या मुलाला त्याचे वडील, एखाद्या कुटुंबाला त्यांचा आधार पुन्हा देऊ शकते. म्हणूनच अक्कलकोट शहर व तालुक्यातील सर्व तरुणांना आणि रक्तदात्यांना मनापासून आवाहन आहे — या वर्षीही मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात सहभागी व्हा आणि रक्तदान करून या माणुसकीच्या कार्याला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

आपण केलेले रक्तदान एखाद्याच्या आयुष्यातील उद्याची नवी पहाट ठरू शकते! असेही मुस्लिम समाजाने म्हटले आहे.

# ध्वजारोहणाने स्वातंत्र्य दीन उत्साहात



अक्कलकोट : (स. गांवकरी)

आज १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित मैंदर्गी रोड वरील कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालय व ए.वन चौक येथील श्री स्वामी समर्थ शिशु विकास मंदिरात देवस्थानचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश मालक इंगळे यांचे हस्ते अनुक्रमे सकाळी ०८:०५ व ०८:३० वाजता राष्ट्रीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, प्राचार्य नागनाथ जेऊरे सर, संतोष पराणे, श्रीशैल गवंडी, स्वामी लोणारी, गिरीश पवार, बाळासाहेब एकबोटे, प्रसन्न हत्ते, सुनील पवार, रमेश शिंदे, स्वाती गाडे, सदिच्छा कदम, उमेश सोनवणे, बंटी नारायणकर, मगदूम, अरवतकर, कडबगावकर, काशिनाथ इंडे, संजय पवार, सागर गोंडाळ, संजय मोरे, व स्टापचे इतर कर्मचारी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर सर्व मान्यवरांना व विद्यार्थ्यांना देवस्थानच्या वतीने अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती.

# सोलापूर महानगरपालिकेला पीएम ई-बस योजनेंतर्गत १०० ई-बसेस मंजूर

अक्कलकोट : (स. गांवकरी)

सोलापूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत एकूण १०० ई-बसेस मंजूर झाल्या आहेत. त्यापैकी आज सोलापूर शहरासाठी ४ ई-बसेस उपलब्ध झाल्या असून, आज सायंकाळपर्यंत आणखी १६ ई-बसेस उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात एकूण २० ई-बसेस शहराच्या सेवेत दाखल होणार आहेत. सोलापूर महानगरपालिकेच्या एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री मा. जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते उपलब्ध झालेल्या ४ ई-बसेसचे लोकार्पण करण्यात आले. या ई-बसेसमुळे सोलापूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक आधुनिक, आरामदायी, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक होण्यास मदत होणार आहे. यावेळी स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत ४ रोड स्वीपर तसेच १ जेटिंग मशीनचेही उद्घाटन करण्यात आले. आधुनिक यंत्रसामग्रीच्या माध्यमातून शहरातील रस्ते स्वच्छतेचे काम अधिक प्रभावीपणे व जलदगतीने करता येणार असून,



- पहिल्या टप्प्यात २० बसेस उपलब्ध
- पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते ई-बसेस, रोड स्वीपर व मशीनरीचे लोकार्पण
- महापालीकेच्या ७२ कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश

स्वच्छ आणि सुंदर सोलापूरच्या दिशेने महापालिकेच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. या कार्यक्रमात सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने लाड-पागे समितीअंतर्गत, शैक्षणिक पात्रतेनुसार तसेच अनुकंपा तत्त्वावरील आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्राथमिकता पाच कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. यामध्ये १५ सफाई कामगार, ७ झाडूवाले, २३ बिगारी, शैक्षणिक पात्रतेनुसार १७ आणि अनुकंपा तत्त्वावर १०, अशा एकूण ७२ महापलिका कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या नियुक्त्यांमुळे महापालिकेच्या विविध विभागांमध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होऊन नागरिकांना नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे देण्यास मदत होणार आहे. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्रजी काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते,महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे जिल्हाधिकारी एन कार्तिकयेन आणि पोलीस आयुक्त एम. राजकुमार, स्थापत्य समितीच्या सभापती विजय चिप्पा, विधी समितीचे सभापती सत्यजित वाघमोडे, वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीचे सभापती सुनील खटके, मंडई व उद्यान समितीचे सभापती राजशेखर पाटील, कामगार व समाजकल्याण समितीच्या सभापती श्रद्धा पवार तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निर्मला जंगम याच्यासह अतिरिक्त आयुक्त, वीणा पवार, उपायुक्त सोनाली यादव, सहायक आयुक्त शशिकांत, तसेच नगरसेविका श्रीदेवी फुलारे, वंदना गायकवाड, सुधा आरळी मोरे, नगरसेवक आनंद जाधव, बिजू प्रधान, किसन जाधव, अक्षय अंजीखाने यांच्यासह राहुल कुलकर्णी, अनिल चराटे, नीलकंठ मतपती आदी उपस्थित होते. सोलापूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे, स्वच्छता यंत्रणेचे आधुनिकीकरण करणे आणि महापालिकेच्या सेवेसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे या तिन्ही महत्त्वाच्या बाबींना आजच्या कार्यक्रमातून चालना मिळाली. त्यामुळे ‘स्वच्छ, सुंदर आणि आधुनिक सोलापूर’ घडविण्याच्या महापालिकेच्या प्रयत्नांना निश्चितच गती मिळणार आहे.



ठाणे : दिवा प्रभाग समिती कार्यालयात ८० वा स्वातंत्र्यदिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला प्रसंगी ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त मा. शिवप्रसाद नागरगोजे, दिवा प्रभाग समिती अध्यक्ष तथा नगरसेवक दीपक जाधव, नगरसेविका अर्चना निलेश पाटील व सर्व महानगर पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(फोटो - संतोष पडवळ)

# मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिकच्या विकासासाठी विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून प्रयत्न करण्यात येत आहेत. सौर कृषी वाहिनी, शेतकरी कर्जमुक्ती, ‘वीर प्रेरणा स्थळ’, ‘शिव मार्ग’ व ‘राम मार्ग’ सह विविध विकास योजनांच्या माध्यमातून नाशिकच्या विकासाचा रोडमॅप तयार झाला आहे. शेतकरी, युवक यांना पाठबळ देण्यासोबतच जिल्ह्याच्या पर्यटनाला नवी दिशा मिळणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन व कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आवारात मंत्री गिरीश महाजन यांच्या



हस्ते ध्वजारोहण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी उपस्थितांना उद्देशून केलेल्या भाषणात मंत्री श्री. महाजन यांनी नाशिकच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प व्यक्त करताना शेतकरी, महिला, युवक, पर्यटन, पर्यावरण आणि सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने विविध महत्त्वपूर्ण उपक्रमांची माहिती दिली.

या समारंभास आमदार सरोज अहिरे, महापौर हिमगौरी आडके, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त डॉ. संदीप कर्णिक, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनापुरे, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक डी.एस.स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा, महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण अकादमीचे अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते

यावेळी मंत्री श्री.महाजन यांनी भाषणात नाशिक जिल्ह्याच्या विकासाचा रोडमॅपच सादर केला. नाशिक जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती त्यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर जिल्ह्यात होऊ घातलेल्या विकास कामांच्या संकल्पाची माहिती त्यांनी दिली. नाशिक ही क्रांतिकारकांची भूमी असून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्थापन केलेले ‘अभिनव भारत मंदिर’ नव्या स्वरूपात उभे राहत आहे. या ऐतिहासिक वास्तूचे लवकरच लोकार्पण होणार असून येणाऱ्या पिढ्यांना ती प्रेरणा देत राहील. युवकांना प्रेरणा मिळावी यासाठी शहीद जवानांचे ‘वीर प्रेरणा स्थळ’ जिल्ह्यात स्थापन करण्याची घोषणा मंत्री श्री. महाजन यांनी यावेळी केली. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे सांगताना मंत्री श्री. महाजन यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या टप्प्यात नाशिक जिल्ह्यातील २० हजारांहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात पावणेदोनशे कोटी रुपये थेट जमा झाल्याचे सांगितले. उर्वरित पात्र शेतकऱ्यांना दुसऱ्या टप्प्यात लाभ मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या माध्यमातून ग्रामपंचायतींनी मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध करून दिल्याने जिल्ह्यात सुमारे ५१५ मेगावॅट वीज मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा हक्काची वीज उपलब्ध होत असून या योजनेच्या अंमलबजावणीत नाशिक जिल्हा राज्यात सर्वप्रथम असल्याचे मंत्री श्री. महाजन यांनी नमूद केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४४। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार दि. १७ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## संयुक्त महाराष्ट्राच्या १०६ हुतात्म्यांना नव्या प्रशासकीय इमारतीत मानाचे स्थान मिळणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुख्य सचिवांना कार्यवाहीचे निर्देश

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हौतात्म्य पत्करलेल्या १०६ हुतात्म्यांचे चिरंतन स्मरण व्हावे, यासाठी महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतलेल्या एअर इंडियाच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात या सर्व हुतात्म्यांची नावे ठळकपणे आणि सन्मानपूर्वक प्रदर्शित करण्याच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

सांस्कृतिक कार्य मंत्री अँड. आशिष शेलार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून ही मागणी केली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या ऐतिहासिक आंदोलनात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्राची निर्मिती झाली असून, या हुतात्म्यांचे योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे, असे अँड. शेलार यांनी पत्रात नमूद केले होते.

महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतलेल्या एअर इंडियाच्या नव्या इमारतीचे सध्या नूतनीकरण सुरू असून, लवकरच या इमारतीत प्रशासकीय कामकाज सुरू होणार आहे. ही इमारत महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय कामकाजाचे महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याने तिच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागात संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान देणाऱ्या १०६ हुतात्म्यांची नावे आकर्षक, सन्मानपूर्वक आणि ठळक अक्षरांत कायमस्वरूपी प्रदर्शित करण्यात यावीत, अशी मागणी अँड. शेलार यांनी केली होती.

ज्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्र आपल्याला मिळाला, त्या हुतात्म्यांचे स्मरण भावी पिढ्यांना प्रेरणा देणारे ठरेल. त्यांच्या त्यागाला शासनाच्या वतीने मानाचे स्थान देणे ही आपली जबाबदारी आहे. १०६ हुतात्म्यांची नावे प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात प्रदर्शित करणे ही त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना अँड. आशिष शेलार यांनी व्यक्त केली.

या कामासाठी आवश्यक असल्यास सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून संबंधित विभागाला योग्य ते सहकार्य करण्यात येईल, असेही मंत्री अँड. शेलार यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या



पत्रात स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीची दखल घेत राज्याच्या मुख्य सचिवांना कार्यवाहीचे निर्देश दिल्याने संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात बलिदान देणाऱ्या १०६ हुतात्म्यांना राज्याच्या महत्त्वाच्या प्रशासकीय इमारतीत मानाचे आणि कायमस्वरूपी स्थान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## गुरुवर्य रा.वि.पाटणकर सर्वोदय विद्यालयाचा ८० वा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

### एनसीसी व स्काऊड गाईड च्या छात्रांनी दिली राष्ट्र ध्वजाला मानवंदना



**राजूर (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे गुरुवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ८० वा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी एनसीसी प्रमुख संजय देशमुख व स्काऊड गाईड प्रमुख धनंजय लहामगे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी तसेच स्काऊड गाईडच्या छात्रांनी ध्वजाला मानवंदना दिली.

विद्यालयाचे ध्वजारोहण जेष्ठ नागरीक विठ्ठल खाडे यांचे हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे जेष्ठ संचालक विजय पवार, श्रीराम पन्हाळे, शिक्षण निरिक्षक लहानू पर्बत, माजी प्राचार्य मनोहर लेंडे, प्राचार्य भाऊसाहेब बनकर, उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे, पर्यवेक्षक संजय व्यवहारे, अधिक्षक मच्छिंद्र ढगे यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

क्रिडा शिक्षक जालिंदर आरोटे व विनोद तारू,गोरक्षनाथ शिंदे यांनी स्वातंत्र्य दिनाची तयारी केली होती.

जेष्ठ संचालक विजय पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कॉपीमुक्त अभियानाची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धनंजय पगारे यांनी केले.

## ढोरजातील काशी विश्वनाथ यात्रोत्सवाची शिवभक्तांसाठी पर्वणी

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

- डोंगररांगेच्या कुशीत भक्ती-निसर्गाचा अनोखा संगम;
- श्रावणी सोमवारनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

तालुक्याच्या उत्तर दिशेला डोंगररांगेच्या पायथ्याशी निसर्गरम्य वातावरणात वसलेले ढोरजा येथील श्री काशी विश्वनाथ मंदिर श्रावण महिन्यात शिवभक्तांचे श्रद्धास्थान ठरते. डोंगररांगा, हिरवाई, बारमाही वाहणारे ओढे–नाले आणि वनसंपदेच्या सान्निध्यामुळे या देवस्थानाला धार्मिक महत्त्वाबरोबरच निसर्गसौंदर्याचीही अनोखी किनार लाभली आहे. पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी येथे काशी विश्वनाथ यात्रोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे.

यात्रोत्सवानिमित्त देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली आहे. पहाटे ३ ते सकाळी ९ वाजेपर्यंत दंडवताचा कार्यक्रम होणार आहे. तसेच पहाटे ३ ते सकाळी ६ या वेळेत श्री क्षेत्र भीमाशंकर येथून पायी कावड घेऊन येणाऱ्या भाविकांचे काशी विश्वनाथ देवस्थानात आगमन होणार असून, कावडधारी भाविकांकडून शिवलिंगावर जलाभिषेक करण्यात येणार आहे.

दुपारी १२ ते २ या वेळेत मानाच्या काठ्या व पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत भजनाचा कार्यक्रम होणार असून, रात्री ९ ते ११ या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातून हजारो भाविक यात्रोत्सवासाठी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

श्रद्धेची पताका, निसर्गाची हिरवाई आणि शिवभक्तीचा जयघोष अशा त्रिवेणी संगमात यंदाचा काशी विश्वनाथ यात्रोत्सव रंगणार आहे. धार्मिक परंपरेनुसार या स्थळाला 'दक्षिणेतील काशी' म्हणूनही मान्यता असल्याने श्रावण महिन्यात येथे शिवभक्तांची मोठी गर्दी होते.

निसर्गसौंदर्याचे आकर्षण

काशी विश्वनाथ मंदिर परिसराचे वैशिष्ट्य म्हणजे येथील निसर्गसंपन्न वातावरण. डोंगररांगा, दऱ्याखोऱ्या, हिरवीगार वनसंपदा आणि बाराही महिने खळखळणारे ओढे–नाले यामुळे परिसराला वेगळेच सौंदर्य लाभले आहे. दुर्मिळ वृक्षसंपदा आणि वन्यजीवांचा अधिवास यामुळे हे क्षेत्र निसर्गप्रेमी, गिरिप्रेमी तसेच साहसप्रेमी पर्यटकांसाठीही आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. त्यामुळे भक्ती, परंपरा आणि निसर्गाचा सुंदर संगम अनुभवण्यासाठी भाविक आवर्जून येथे भेट देतात.

साडेचार कोटींच्या विकासकामांतून सुविधा

महाराष्ट्र शासनाने या देवस्थानाला 'क' वर्ग देवस्थान म्हणून मान्यता दिली आहे.

## माझी स्मरणगाथा' अकोले तालुक्याच्या इतिहासाची अभ्यासपूर्ण बखर : डॉ. संदीप सांगळे

**अकोले (समर्थ गांवकरी)**

'माझी स्मरणगाथा' हे पुस्तक अकोले तालुक्याच्या इतिहास, समाजजीवन, संस्कृती आणि परिवर्तनाचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणारे महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरणार असून इतिहासप्रेमी, साहित्यप्रेमी आणि संशोधकांसाठी मौल्यवान संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी व्यक्त केली. अकोले तालुक्याच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवासाचा वेध घेणारे ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे लिखित 'माझी स्मरणगाथा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी अकोले महाविद्यालयातील के. बी. दादा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सांगळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चपराक प्रकाशक व ज्येष्ठ संपादक




घनश्याम पाटील होते. प्रारंभी अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, ज्येष्ठ विचारवंत प्रा. एस. झेड. देशमुख, डॉ. संदीप सांगळे, प्रकाशक घनश्याम पाटील, साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांच्यासह मान्यवरांच्या शुभहस्ते 'माझी स्मरणगाथा'चे प्रकाशन करण्यात आले.

## इथेनॉलमुक्त पेट्रोल हवंय? घरबसल्या असा शोधा तुमच्या जवळचा पंप!

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**



देशभरातील बहुतांश पेट्रोल पंपांवर सध्या ए२० म्हणजेच २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल उपलब्ध आहे. केंद्र सरकारच्या इथेनॉल ब्लेंडिंग धोरणामुळे ए२० पेट्रोलचा वापर वाढला आहे. मात्र, जुन्या वाहनांचे मायलेज, इंजिनची कार्यक्षमता आणि काही सुट्या भागांवर होणारा संभाव्य परिणाम याबाबत अनेक वाहनचालकांच्या मनात प्रश्न आहेत. त्यामुळे काही जण इथेनॉलमुक्त म्हणजेच ए० पेट्रोल शोधत आहेत.

सरकारकडून E0 किंवा E10 पुन्हा आणण्याची योजना नाही :

सर्वसामान्य वापरासाठी ए० किंवा ए१० पेट्रोल पुन्हा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्याची कोणतीही योजना नसल्याचे पेट्रोलियम मंत्रालयाने संसदेत स्पष्ट केले आहे. मात्र, काही प्रीमियम आणि उच्च ऑक्टेन पेट्रोल प्रकार ए२० ब्लेंडिंगच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले आहेत. यामुळे काही निवडक पेट्रोल पंपांवर इथेनॉलमुक्त प्रीमियम पेट्रोल उपलब्ध आहे.

## देशातील १२ राज्यांना मुसळधार पावसाचा इशारा

### नेमका कुठे आणि कसा पाऊस पडणार?

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या हवामान प्रणालीमुळे देशातील अनेक भागांत मान्सून सक्रिय झाला असून, पुढील काही दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) रविवारी उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली–एनसीआर, राजस्थान, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू–काश्मीर, मध्य प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि झारखंडमधील विविध भागांसाठी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. उत्तर प्रदेशात संततधार पावसामुळे गंगा नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली असून, वाराणसीतील अनेक छोटी मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत रविवारी पावसाची शक्यता आहे.

## अमृत उद्योग समूहात ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा

### देश सामर्थ्य बनवण्यासाठी राज्यघटना महत्वाची
### स्वतंत्र अमृतवाहिनी विद्यापीठाची स्थापना : मा.शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक थोर पुरुषांनी बलिदान दिले. त्यांना अभिवादन करताना हा देश अधिक समृद्ध करण्यासाठी तरुणांनी राज्यघटना व लोकशाही जपण्यासाठी कटिबद्ध राहिली पाहिजे. आपल्या राज्यघटनेने जगाला मानवतेचा संदेश दिला असून चांगल्या सहकारी व शिक्षण संस्था हे आपले वैशिष्ट्य असून स्वतंत्र अमृतवाहिनी विद्यापीठ मिळाले असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

अमृत उद्योग समूहात सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी समवेत व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, बाबासाहेब ओहोळ, कॅन्सर तज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात, रामहरी कातोरे, अमृतवाहिनी संस्थेच्या विश्वस्त सौ.शरयूताई देशमुख, संचालक विजय राहणे, रामनाथ कुटे,डॉ. तुषार दिघे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्रा. विवेक धुमाळ, किरण कानवडे, कृष्णा दिघे यांच्यासह विविध पदाधिकारी सर्व विभागांचे प्राचार्य अधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक राष्ट्रपुरुषांनी त्याग व बलिदान केले आहे. त्यांच्या प्रति आदर राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. विविध भाषा धर्म जात पंथ असूनही राज्यघटनेमुळे आपण सर्व एक आहोत. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य भारतीय राज्यघटनेमुळे आपल्याला मिळाले आहे देश अधिक सामर्थ्यवान होण्यासाठी राज्यघटना जपणे अत्यंत गरजेचे आहे.

मात्र सध्या काही लोक धर्माच्या नावावर राजकारण करत असून जातीभेद निर्माण करत आहेत. गुन्हेगारी वाढली आहे. गुन्हेगाराला कोणताही धर्म नसून त्याला शिक्षा झालीच पाहिजे. असे सांगताना थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी वयाच्या १८ व्या वर्षी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली १८ महिने कारावास भोगला त्यांचा वारसा आपल्याला लाभला असून त्यांच्या तत्त्वानुसार संगमनेरच्या सहकारी व शैक्षणिक संस्था वाटचाल करत आहेत. यावर्षी स्वतंत्र अमृतवाहिनी विद्यापीठ मंजूर झाले असून ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. यापुढील काळातही सर्वांना गुणवत्तेने काम करून हा लौकिक वाढवावा लागणार आहे याचबरोबर राज्यघटना जपण्यासाठी व अधिक मजबूत करण्यासाठी तरुणांनी कटिबद्ध राहावे असे आवाहन त्यांनी केले.

तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, तरुण ही देशाची संपत्ती आहे. झेन झीने क्रांती केली आहे. हा देश आपल्याला पुढे नेण्यासाठी सर्व समाजाला सोबत घेऊन साधूसंतांनी सांगितलेला मानवतेचा विचार जोपासावा लागणार आहे असे त्या



म्हणाल्या.

यावेळी सुरक्षा अधिकारी मोहनराव मस्के यांच्या नेतृत्वाखाली कारखाना कार्यस्थळावर तर नरेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिस्तबद्ध पद्धतीने परेड ने मानवंदना दिली. अमृत उद्योग समूहातील विविध पदाधिकारी अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले.

### दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांमधून देशभक्तीचा जागर

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर अमृत उद्योग समूहातील विविध विद्यालय व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी अत्यंत दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.यामध्ये पंजाबी, भांगडा,गवळण,डोंबारी गीत,फ्युजन साँग,महाराष्ट्राची लोकधारा, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा यांच्यासह विविध कार्यक्रमांनी अंगावर शहरे आणले. सर्व गीतांमधून देशभक्तीचा जागर करण्यात आला. यावेळी पालक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अमृत उद्योग समूहात विविध ठिकाणी अभिवादन

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना मुख्य कार्यस्थळावर व अमृतवाहिनी शिक्षण संस्थेत लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते तर ध्वजारोहण झाले. राजहंस दूध संघ येथे चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांच्या हस्ते तर डेंटल कॉलेज येथे डॉ.सुधीर तांबे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. अमृतवाहिनी बँकेमध्ये कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.यावेळी या सर्व संस्थांचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# ब्राम्हणवाड्यात साईनाथ गायकर याच्या मृत्यूने गाव एकवटले; अवैध दारूबंदीच्या मागणीसाठी ग्रामस्थांचा एल्गार!

## अवैध दारूविक्रेत्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची उपसरपंच सुभाष गायकर यांची मागणी; कारवाई न झाल्यास २५ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा!

ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावातील ३५ वर्षीय साईनाथ कैलास गायकर याच्या मृत्यूने संपूर्ण गाव हादरले असून, या घटनेनंतर गावातील अवैध दारूविक्रीचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. साईनाथ गायकर यांचा विषारी दारू प्यायल्याने मृत्यू झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत असून, त्यांच्या मृत्यूला नेमके कोण जबाबदार आहे, याची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अवैध दारूविक्रीमुळे गावातील अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून, वारंवार तक्रारी करूनही अवैध दारूविक्री पूर्णपणे बंद होत नसल्याने संबंधित यंत्रणांच्या कारवाईवरही ग्रामस्थांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

साईनाथ कैलास गायकर यांच्या मृत्यूनंतर ब्राम्हणवाडा गावातील ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली असती तर ही दुर्दैवी घटना टाळता आली असती का, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. साईनाथ यांना दारूचा पुरवठा कोणी केला, दारू कुठून आणण्यात आली, ती विषारी होती का आणि त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण काय आहे, या सर्व बाबींची चौकशी होणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



वैद्यकीय तपासणी व अधिकृत चौकशीचा अहवाल समोर आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असले तरी, या घटनेच्या पार्श्वभूमीवर गावातील अवैध दारूविक्रीविरोधात कठोर भूमिका घेण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी पत्रकार संजय गायकर यांनी ब्राम्हणवाडा परिसरातील अवैध दारूविक्रीचा प्रश्न दैनिक समर्थ गांवकरीच्या माध्यमातून प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. याबाबत संबंधित विभागांकडे तक्रारीही करण्यात आल्या होत्या. त्यानंतर संबंधित अवैध दारूविक्रेत्यांवर मोठ्या रकमेची दंडात्मक कारवाई झाल्याचे सांगण्यात येते. मात्र, कारवाई झाल्यानंतर काही दिवसांतच पुन्हा अवैध दारूविक्री सुरू होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे केवळ अधूनमधून कारवाई करून प्रश्न सुटणार नसून, अवैध दारूविक्रीचे मूळ शोधून कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, अवैध दारूविक्रीविरोधात आवाज उठविल्याने पत्रकार संजय गायकर यांना एका अवैध दारूविक्रेत्याकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची तक्रार यापूर्वी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती. त्यामुळे गावात अवैध दारूविक्रीचा व्यवसाय किती खोलवर रुजला आहे, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. पत्रकार, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी वेळोवेळी आवाज उठवूनही हा प्रकार सुरूच राहत असेल, तर संबंधित यंत्रणांनी याची गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

साईनाथ गायकर यांच्या मृत्यूनंतर ब्राम्हणवाडा गावचे उपसरपंच सुभाष गायकर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. गावातील अवैध दारूविक्री तातडीने आणि कायमस्वरूपी बंद करण्यात यावी, तसेच साईनाथ गायकर यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी संबंधित प्रशासनाकडे केली आहे. अवैध दारूविक्रेत्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

प्रशासनाकडून ठोस आणि प्रभावी कारवाई करण्यात आली नाही, तर २५ ऑगस्ट २०२६ पासून आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा उपसरपंच सुभाष गायकर यांनी दिला आहे. या आंदोलनात ग्रामपंचायत सदस्य शिवाजी आरोटे, पत्रकार संजय गायकर तसेच गावातील ग्रामस्थ सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे आगामी काळात ब्राम्हणवाड्यात अवैध दारूविक्रीविरोधातील आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

'कारवाई होते, मात्र दारूविक्री पुन्हा सुरू होते' – ग्रामस्थांचा आरोप:




अवैध दारूविक्रीविरोधात पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून वेळोवेळी कारवाई केली जाते. मात्र, कारवाईनंतर काही दिवसांनी पुन्हा त्याच ठिकाणी अवैध दारूविक्री सुरू होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे कारवाईचा केवळ आकडा वाढविण्यापेक्षा अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर सातत्याने लक्ष ठेवणे, दारूचा पुरवठा करणाऱ्या साखळीचा शोध घेणे आणि संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

साईनाथ गायकर याच्या मृत्यूमुळे गावातील नागरिकांमध्ये निर्माण झालेला रोष केवळ एका घटनेपुरता मर्यादित नसून, गावातील अवैध दारूविक्री कायमस्वरूपी बंद करण्यासाठी ग्रामस्थ आता एकवटले आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून साईनाथ यांच्या मृत्यूचे खरे कारण समोर आणावे, दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि ब्राम्हणवाडा गाव अवैध दारूमुक्त करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विकासात आणखी एक मानाचा तुरा; मुलींच्या नवीन वसतिगृहाचे उद्घाटन संपन्न

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी: विद्यार्थिनींना सुरक्षित, सुसज्ज आणि शैक्षणिकदृष्ट्या पोषक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बेलवंडी येथील इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या नवीन मुलींच्या वसतिगृहाचा उद्घाटन समारंभ रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

मा. श्री. काशिनाथ दाते (सर), आमदार व विधानसभा सदस्य, पारनेर यांच्या शुभहस्ते वसतिगृहाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. राजेंद्र (दादा) शिवाजीराव नागवडे, चेअरमन, स. म. शि. ना. नागवडे सहकारी साखर कारखाना लि., श्रीगोंदा फॅक्टरी तथा अध्यक्ष, छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था



हे होते. यावेळी स्वर्गीय बापूंच्या आदर्श विचारांचा वारसा घेऊन श्री राजेंद्र दादा नागवडे यांच्या नेतृत्वाखाली आज श्रीगोंदा तालुक्यामध्ये श्री शिवाजीराव नारायणराव नागवडे सहकारी साखर कारखाना, सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे तालुका दूध संघ यासारख्या अनेक सहकारीसंस्था आदर्शवत चालू आहेत तसेच शिक्षण क्षेत्रामध्ये दादांच्या मार्गदर्शनाने आज श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था तसेच ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्था व तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान या तिन्ही संस्थेच्या माध्यमातून१६००० विद्यार्थी या तालुक्यात शिक्षण घेत आहे.

या कर्तुत्ववान नेतृत्वानेइंदिरा गांधी पॉलिटेक्निक मुलींच्या वस्तीगृहाची एक आदर्श इमारत उभी केली आहे असे श्री आमदार काशिनाथ दाते सर यांनी आपल्या भाषणात गौरवोद्गार काढले.शिक्षणासोबत सुरक्षित निवासाची सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असून विद्यार्थिनींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेने महत्त्वपूर्ण पाऊल उचले आहे.अशी भावना प्रमुख अतिथी श्री.काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केली मा. श्री. प्रशांत गायकवाड, संचालक, अ.नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; मा. श्री. वसंतराव चेडे, मा. जिल्हा परिषद सदस्य, अ.नगर, मा. सौ. मेघाताई संदीपराव ओटी, व्हा. चेअरमन, स. म. शि. ना. नागवडे सहकारी साखर कारखाना लि.; तसेच मा. श्री. भगवानराव (आबा) पाचपुते, अध्यक्ष, श्रीगोंदा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शिष्यवृत्ती परीक्षेत ईशान कदम ची दमदार कामगिरी

पुणे प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २६ एप्रिल २०२६ रोजी निकाल जाहीर करण्यात आला आहे या निकाला मध्ये सीबीएसई/ आय सी एस इ बोर्डाच्या प्रशालेतील विद्यार्थी ईशान कदम आणि बुद्धिमत्ता मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर उल्लेखनीय संपादन केले आहे ईशान कदम याने तब्बल ८९.९३२ % गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक पटकाविला आहे त्याच्या या शानदार कामगिरीमुळे ज्ञान प्रबोधनी शाळेतील शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून ईशानच्या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे शिष्यवृत्ती परीक्षा सारख्या स्पर्धात्मक परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवणं ही निश्चित अभिमानाची बाब आहे ईशान्य आपल्या अभ्यासातील सातत्य योग्य नियोजन आणि कठोर परिश्रमाच्या चोरावर हे यश



मिळवले आहे या उल्लेखनीय यशाबद्दल ईशान कदम यांचे ज्ञान प्रबोधनी मुख्याध्यापक शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी पालक तसेच मित्र परिवाराकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे ईशानच्या या यशामागे त्याचे पालक आणि शिक्षकांचे मार्गदर्शन व प्रवचनही तितकेच महत्त्वाचे आहे त्याच्या या योगदानाबद्दल त्याचे अभिमान त्याचे अभिनंदन केले जात आहे विषयांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही निश्चितच प्रेरणा मिळणार असून मेहनत जिद्द आणि सातत्याच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते याचा आदर्श त्याने आपल्या कामगिरीतून घालून दिला आहे राज्याच्या गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक आणि ८९.९३२ % गुण मिळवणाऱ्या ईशान कदम चे पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या

# नागपंचमी

श्रावणाच्या सरीतील सर्वात पहिला सण म्हणजे नागपंचमी. यादिवशी नागाची पूजा केली जाते. गावाकडील काही महिला आजही वारुळा जवळ जाऊन नागाची पूजा करतात. नागपंचमीला महिला नागाची, वारुळाची मनोभावे पूजा करतात. तसेच यादिवशी नागाच्या कथा ऐकल्या जातात.

भगवान श्रीकृष्णाने कालिया नावाच्या सर्पाचा पराभव केला. कालिया यमुनेच्या डोहात राहत होता. यमुनावासियांना त्रास देण्यासाठी तो यमुनेच्या डोहात विष कालवीत असे. यमुनेचे पाणी विषारी झाल्याने लोकांचे हाल होत होते. त्याला हाकलून देऊन , यमुनेचे पाणी सर्वांना पिण्यासाठी स्वच्छ करावे म्हणून श्रीकृष्ण एकटाच कालियाचा पराभव करायला निघाला. यमुनेच्या डोहात श्रीकृष्ण आणि कालिया नागाचे युद्ध झाले.

श्रीकृष्णाने कालियाच्या डोक्यावर नृत्य करू लागला. कालिया कासावीस झाला. त्याची बायका, मुले घाबरली आणि कालियासाठी जीवदान मागू लागली. अखेर आपल्या सर्व परिवारासह तेथून निघून जाण्याचे व पुन्हा कधीही ब्रजवासियांना त्रास न देण्याच्या अटीवर कृष्णाने त्याला सोडले.

कालियाने यमुनेतील सर्व विष शोषून घेतले. भगवान श्रीकृष्णाने प्रसन्न होऊन, त्याला वरदान दिले की त्याच्या या कर्तृत्वासाठी श्रावण शुक्ल पंचमीला नागपंचमीचा सण साजरा केला जाईल आणि नागांची पूजा केली जाईल.

दरम्यान असे ही सांगितले जाते की, ज्या दिवशी श्रीकृष्णाने कालिया नागाचा पराभव केला तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता आणि तेव्हापासून नागपंचमी साजरी केली जाते.

नागपूजा महाभारताच्या काळापासून सुरु आहे. महाभारतात नागपूजे संदर्भात काही महत्त्वाच्या नोंदी आहेत. आर्य लोक भारतात आले. त्यांनी यमुना नदीच्या खोऱ्यात वस्ती केली. कालांतराने तो भाग अपुरा पडायला लागल्यावर ते पूर्व भागाकडे सरकू लागले. तेथे त्यांच्या ही पूर्वी वस्ती केलेले लोक होते. ते नागवंशाचे लोक होते.

आपल्या प्रांतावर हे आर्य लोक आक्रमण करीत आहेत, हे पाहिल्यावर त्यांनी विरोध केला. त्यांच्यात युद्धे होऊ लागली. एकदा नागराज तक्षक याने आर्यांचा राजा परिक्षित याचा वध केला. यामुळे त्याचा मुलगा जन्मेजय भयंकर संतापला. त्याने आपल्या पित्याचा सूड घ्यायचे ठरविले आणि नाग लोकांना मारण्याचा सपाटा लावला.

यज्ञात समिधा जशा जळून भस्म होतात, तसे नाग लोक जन्मेजयाच्या क्रोधाग्नीत नाहीसे होऊ लागले. यांचा हा संघर्ष शेवटी आस्तिक ऋषींनी मिटवला. आस्तिक ऋषी दोन्ही बाजूंशी संबंधित होते. त्यांचे वडील आर्य होते आणि माता नागवंशी होती. मात–पिता या दोघांचीही नावे 'जरत्कारू' अशीच होती. आर्य आणि नागवंश यांच्या विवाह व्हावा, एवढे ते एकमेकांच्या सहवासात आले होते. महाभारत काळात असे विवाह होतही होते.

अर्जुनाचा विवाह नागकन्या उलुपीशी झाला होता. हे नाग लोक सुधारलेले होते, शूर होते, कलारसिक होते. त्यांचे नगर–रचना–कौशल्यही वाखाणण्यासारखे होते. तेव्हा अशा प्रगत वंशाशी चाललेला संघर्ष आस्तिक ऋषींनी संपविला. त्यांच्यात ऐक्य निर्माण केले.शेवटी ते नागलोक आर्यांत मिसळून गेले आणि कदाचित या ऐक्याप्रीत्यर्थ, आनंदाप्रीत्यर्थ हा सण नागपूजा म्हणून आर्यांच्या सणात घेतला गेला असावा, असे सांगितले जाते.

नागपंचमीसंदर्भात एक कथा अशी सांगितली जाते, जेव्हा समुद्रमंथन झाले त्यावेळी वासुकी नागाचा उपयोग दोरीसारखा करण्यात आला होता. देवतांनी वासुकी नागाची शेपटी धरली, तर राक्षसांनी त्याचे तोंड धरले. मंथनाच्या वेळी पहिले विष बाहेर पडले जे भगवान शिवाने ते हलाल प्राशन करून संपूर्ण जगाचे रक्षण केले.

यानंतर बाहेर आलेले अमृत देवांनी घेतले. श्रावण शुक्ल पंचमी तिथीला ही घटना घडली. समुद्रमंथनात सापांचे मोठे योगदान होते ते लक्षात ठेवण्यासाठी नागपंचमी सण म्हणून साजरा केला जाऊ लागला असे ही सांगितले जाते.

नागपंचमीला शेतकऱ्याची कथा आवर्जून सांगितली जाते. ती कथा अशी मणिपूर नावाचे एक गाव होते. तिथे एक शेतकरी राहत होता. एक दिवस तो आपले शेत नांगरीत होता. शेतात एक वारूळ होते. नांगरता–नांगरता नांगराचा फाळ त्या वारुळावरून फिरला. वारूळ उद्ध्वस्त झाले. त्या वारुळात नागिणीची पिल्ले होती. ती मारली गेली. नागीण बाहेर गेली होती. येऊन पाहते तो मुले मेलेली. काय झाले, ते तिला कळले. ती संतापली, चिडली आणि तिने शेतकऱ्याच्या साऱ्या कुटुंबाला दंश केला. सगळ्यांचा मृत्यू झाला. शेतकऱ्याची एक मुलगी सासरी गेली होती.

नागीण हे समजले ती त्या मुलीच्या घरी निघाली. तिच्या घरी पोहोचली; पण आतले दृश्य पाहून ती दारातच थबकली. ती मुलगी पाटावर नागाचे चित्र काढून त्याची पूजा करीत होती. पूजा झाली, तिने दुधाचा नैवेद्य दाखविला, नागाला नमस्कार केला आणि हात जोडून, 'सुखी ठेव' अशी प्रार्थना केली.

ते पाहून नागीणीचे समाधान झाले आणि तिचा राग शांत झाला. शेतकऱ्याच्या मुलीवर ती प्रसन्न झाली. तिच्या कुटुंबियांना तिने पुन्हा जिवंत केले. तो दिवस होता श्रावण शुद्ध पंचमीचा! तेव्हापासून श्रावण शुद्ध पंचमीला नागपूजनाची प्रथा पडली. तीच नागपंचमी.

विशेष लेख
प्रशांत बाफना

# युवानेते नियाज राजे मित्र परिवाराच्या निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; विद्यार्थ्यांच्या विचारांना मिळाले व्यासपीठ

पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर शहरातील विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, सर्जनशीलतेला आणि सामाजिक जाणिवेला चालना मिळावी, तसेच विद्यार्थ्यांना आपल्या शहराच्या विकासाबाबतचे विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने युवानेते नियाज राजे मित्र परिवाराच्या वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला पारनेर शहरासह परिसरातील शाळांमधून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत एकूण २६२ निबंध प्राप्त झाले.

स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, पारनेर येथून २८ निबंध प्राप्त झाले. यामध्ये प्रथम क्रमांक सायली पंडित शिंदे, द्वितीय क्रमांक सानिका संभाजी देशमाने, तृतीय क्रमांक रोमान रियाज राजे, तर उत्तेजनार्थ ओंकार दिलीप औटी यांनी मिळविला. पारनेर पब्लिक स्कूल, पारनेर येथून सर्वाधिक १२६ निबंध प्राप्त झाले. यामध्ये प्रथम क्रमांक ऋचा राजू खरमाळे, द्वितीय क्रमांक कार्तिकी सोमनाथ सोबले, तृतीय क्रमांक स्पंदन





संतोष भोर यांनी पटकावला.

किसान इंटरनॅशनल स्कूल, पारनेर येथून ३९ निबंध प्राप्त झाले. यामध्ये प्रथम क्रमांक गायत्री मच्छिंद्र मुंढे, द्वितीय क्रमांक राजवीर विक्रम चेडे, तृतीय क्रमांक आदर्श अनिल हजारे यांनी मिळविला. चाटे किड्स स्कूल, पारनेर येथून २७ निबंध प्राप्त झाले.

यामध्ये प्रथम क्रमांक वीर विकास दुधाडे, द्वितीय क्रमांक आरोही प्रदीप गुंड, तृतीय क्रमांक सिराज सियाज राजे यांनी यश संपादन केले. तसेच स्टेला मारीस कॉन्व्हेंट स्कूल, हंगा येथून ४२ निबंध प्राप्त झाले. यामध्ये प्रथम क्रमांक प्रज्योती राजेंद्र शिवणकर, द्वितीय क्रमांक स्वरा चंदन भळगट, तृतीय क्रमांक वेदिका राजू गाडगे यांनी क्रमांक मिळविले.

विद्यार्थ्यांनी मांडले पारनेरच्या विकासाचे विचार

निबंध स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुंदर आणि समर्थ पारनेर, शिक्षणातील प्रामाणिकपणा, परीक्षेतील पारदर्शकता तसेच पारनेर शहराच्या भविष्यातील विकासाबाबत आपले विचार मांडण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आपल्या कल्पना, समस्या आणि भविष्यातील अपेक्षा प्रभावीपणे मांडल्या. या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून विद्यार्थ्यांच्या विचारांना वाव देणे आणि शहराच्या विकासाच्या प्रक्रियेत तरुण पिढीचा सहभाग वाढवणे हा असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

# अमृतसागर दूध संघाची दूध साठवण क्षमता वाढली
# ५० हजार लिटर क्षमतेच्या मिल्क सायलोचे लोकार्पण!

## दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा; ३ बल्क मिल्क कुलर व ७ सचिव संयंत्र संचही उपलब्ध!

डॉ. विश्वासराव आरोटे,
कळसुबाई शिखरावरून



जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२५–२६ अंतर्गत एकात्मिक दुग्ध विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून अमृतसागर सहकारी दूध व्यवसाय व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने दुग्धशाळा वाशेरे येथे ५० हजार लिटर क्षमतेच्या अत्याधुनिक मिल्क सायलोची उभारणी करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या या मिल्क सायलोचे उद्घाटन अमृतसागर दूध संघाचे चेअरमन व माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या हस्ते १५ ऑगस्ट रोजी करण्यात आले. नव्या सायलोमुळे संघाची दूध साठवण, हाताळणी व व्यवस्थापन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असून दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून होणाऱ्या वाढीव दूध संकलनाला त्याचा मोठा फायदा होणार आहे.

अमृतसागर दूध संघाच्या माध्यमातून अकोले तालुक्यासह परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात दूध संकलन केले जाते. दूध संकलनात वाढ होत असताना दूध सुरक्षितपणे साठवून त्याची योग्य पद्धतीने हाताळणी करण्यासाठी अधिक क्षमतेच्या यंत्रणेची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेऊन ५० हजार लिटर क्षमतेचा मिल्क सायलो दुग्धशाळा वाशेरे येथे बसवून १५ ऑगस्टपासून कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यामुळे दूध साठवणुकीची क्षमता वाढण्याबरोबरच दूध संकलन व प्रक्रिया व्यवस्थेला अधिक गती मिळणार आहे. विशेषतः दूध उत्पादकांकडून मोठ्या प्रमाणात दूध उपलब्ध झाल्यास ते योग्य पद्धतीने साठवून त्याची गुणवत्ता कायम ठेवण्यास या यंत्रणेची मदत होणार आहे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
'ई' लिलाव सूचना क्र.०१/२०२६–२७
(वृत्तपत्रप्रसिध्दिकरिता)

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागांतील अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयातील असलेल्या विविध विभागातील निर्लेखिन पात्र निरुपयोगी यंत्रसामुग्री, उपकरणे, व जड संग्रह वस्तु, व इतर साहित्य यांची ई–लिलाव पध्द्तीने विक्री करणेकरीता इच्छूक लिलावदारांचे सहभागाकरीता सदर सूचना प्रसिध्द करण्यात येत असून, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहिल्यानगर अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध आंतर रुग्ण विभाग व इतर विभागातील असलेल्या निर्लेखिन पात्र यंत्र सामुग्री व जड संग्रह निरुपयोगी निकामी साहित्य व इतर साहित्य यांची ई–लिलावाद्वारे विक्री करावयाची असून, विक्री करावयाच्या साहित्याचा संक्षिप्त तपशील www.eauction.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) ई–लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छित असलेल्या लिलावदारांना www.eauction.gov.in या संकेतस्थळावर जाऊन पात्रता मिळवणेसाठी आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता करावी लागेल. तसेच त्याबाबत आवश्यक इसारा रक्कम इत्यादींची पूर्तता करावी लागेल.

३) इच्छूक लिलावदारांच्या दस्तऐवज व अन्य बाबतची पडताळणी करुन त्यांना प्रत्यक्ष लाईव्ह ई–लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र करण्यात येईल. केवळ पात्र व NIC कडे नोंदणीकृत लिलावदारांना या लाईव्ह ई–लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल.

४) सदर ई–लिलावाबाबत अधिक तपशीलाकरीता निम्न नमूद कार्यालयाकडे इच्छूक लिलावदारांना चौकशी करता येईल.

अ) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, पत्रकार चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००१

दूरध्वनी क्रमांक – (०२४१) २४३०८७५, २४३०१२७ वैयक्तिक – २४३०५०६

दूरध्वनी क्रमांक – मो.नं. ८२०८८२७९७२ / ९९२२१७५१८१

इच्छूक लिलावदारांना दि. १७/०८/२०२६ (वेळ १२.००) ते दि. २५/०८/२०२६ (वेळ १४.००) या कालावधीत www.eauction.gov.in या संकेतस्थळावर आवश्यक बाबींची ऑनलाईन पध्दतीने पूर्तता करता येईल.

५) सदरील ई–लिलाव सूचनेबाबतचा अधिकचा तपशिल www.eauction.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अध्यक्ष, जिल्हास्तरीय ई–लिलाव समिती
तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य
रुग्णालय, अहिल्यानगर – ४१४ ००१.

जिमाका/नगर/जाहि/८६/२०२६

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### कोपरगावात मोकाट जनावरांनी घेतला दुसरा बळी

**कोपरगावकरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

कोपरगाव शहरात मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून, रस्त्यावर मुक्तपणे फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. यापूर्वी मोकाट जनावराच्या धडकेत एका निष्पाप व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतरही निष्काळजी प्रशासनाने परिस्थितीत अपेक्षित सुधारणा न केल्यामुळे काही दिवसांपूर्वी मोकाट जनावराच्या धडकेत जखमी झालेल्या आणखी एका व्यक्तीचा रविवार (दि.१६) रोजी उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने कोपरगावकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या सलग दोन दुर्दैवी घटनांमुळे कोपरगाव शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न केवळ वाहतुकीच्या अडथळ्यापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो थेट नागरिकांच्या सुरक्षेपर्यंत जाऊन पोहोचला असून नागरिकांचे कोपरगावच्या रस्त्यावर फिरणे मुश्किल झाले आहे. विशेषतः शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा, चौक आणि वर्दळीच्या भागात जनावरांचे कळप रस्त्यावर ठाण मांडून बसलेले किंवा घोळक्याने उभे असतात. त्यामुळे दुचाकीस्वार, पादचारी तसेच वाहन चालकांना या जनावरांना पार करून जाताना मोठी कसरत करावी लागत आहे.

मोकाट जनावरांमुळे सर्वाधिक धोका महिला, ज्येष्ठ नागरिक, शाळकरी विद्यार्थी आणि दुचाकीस्वारांना निर्माण झाला आहे. अचानक समोर आलेल्या जनावरामुळे वाहनाचा तोल जाणे, अपघात होणे किंवा जनावराने थेट धडक देणे अशा घटना घडण्याची शक्यता कायम आहे. परिणामी, सकाळ–संध्याकाळ घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी बाहेर पडतानाही सावधगिरी बाळगावी लागत असून यापुढे घराबाहेर पडायचे की नाही? असा प्रश्न पडला आहे.

### सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखान्यात बिपीनदादा कोल्हे यांच्या हस्ते झेंडावंदन

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

सालाबादप्रमाणे याही वर्षी भारतीय स्वातंत्रदिनानिमीत्त सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे झेंडावंदन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे उपस्थित होते.



कारखान्याचे अध्यक्ष आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय स्वातंत्रदिनाचे औचित्य साधत नयनमनोहर लायटिंगसह विविध रंगी फुलांची सजावट करण्यांत आली होती. प्रारंभी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कारखान्याचे सुरक्षा अधिकारी श्री. रमेश डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली संरक्षण विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी बँड पथकाच्या तालावर ध्वजसंचलन परेड केली. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी परेड निरीक्षण केले. कारखाना कार्यस्थळावर तिरंगा ध्वजासह रंगीबेरंगी विविध ध्वज लावण्यांत आले होते. ध्वजासमोर बहारदार रांगोळी काढण्यांत आली होती. संजीवनी इंग्लिश मिडीयम स्कुलच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी तबला पेटीच्या तालावर बहारदार राष्ट्रगीत–ध्वजगीत सादर केले. यावेळी तोफेची सलामी देण्यात आली. भारत माता की जय घोषणेने संजीवनी परिसर दुमदूमुन गेला होता. कुंपणास तसेच झाडांना गेरू व पांढरा रंग दिल्याने टीप टॉप स्वच्छतेमुळे सर्वांचेच लक्ष वेधले होते.

### राजूर जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात;

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अन् शाळेला पाणी फिल्टरची भेट!**



राजूर (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राजूर येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन शाळेचे प्राचार्य श्री. चौधरी सर यांनी केले. कार्यक्रमास प्रशासकीय सेवानिवृत्त अधिकारी प्रेमानंदजी पवार, कर्तव्यदक्ष डॉ. बाबासाहेब गोडगे आणि सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी कृष्णा शंकर घोडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर घोरपडवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट!

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा उपक्रम!

अकोले (समर्थ गांवकरी)

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, घोरपडवाडी येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा संघाचा हा प्रयत्न असल्याने पालक, ग्रामस्थ आणि शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. शिक्षणासाठी आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मोठे प्रोत्साहन मिळाले. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, मेहनत आणि चिकाटीने शिक्षण घेत असतात. अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला समाजातील विविध घटकांनी हातभार लावणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या हातात वही, पुस्तके, लेखणी आणि इतर शैक्षणिक साहित्य देणे म्हणजे केवळ वस्तूंचे वाटप नसून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आधार देण्याचे कार्य आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रंगनाथ भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून मिळणारे प्रोत्साहन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि डॉ.



विश्वासराव आरोटे यांचे शाळेच्या वतीने आभार मानले. उपाध्यापक रमेश खरबस यांनीही आभार व्यक्त करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे सांगितले. शाळा आणि विद्यार्थ्यांच्या पाठीशी समाजातील विविध घटकांनी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

'विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी केलेली मदत म्हणजे देशाच्या भविष्यातील गुंतवणूक' यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले, शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे सर्वात प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तक, वही आणि लेखणी देणे म्हणजे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक पाऊल पुढे टाकणे होय.

# आळसमुक्त, भीतीमुक्त आणि शिस्तप्रिय जीवन हीच यशाची गुरुकिल्ली : मेजर अंकीत पाठक (सेना मेडल)

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



विद्यार्थीदशेपासूनच आळस आणि भीती झटकून स्वयंशिस्त अंगीकारणे ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) माध्यमातून मिळणारे प्रशिक्षण विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि राष्ट्रभक्तीची भावना रुजविण्यास अत्यंत उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन मेजर अंकीत पाठक (सेना मेडल) यांनी केले. भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त आदर्शगाव हिवरेबाजार येथे आयोजित विशेष कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच देशसेवेची भावना मनात रुजवावी, असे आवाहन करून मेजर पाठक यांनी नमूद केले की, एनसीसीच्या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव, नेतृत्वगुण आणि शिस्तीचे खडे धडे मिळतात. यावेळी त्यांनी जगासाठी आदर्श ठरलेल्या हिवरेबाजार गावातील विकासकार्यांचे व विविध उपक्रमांचे भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्यामध्ये देशसेवेची प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठी एनसीसीच्या विद्यार्थ्यांना विविध रँक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सुभेदार संजय ठाणगे हे होते.यावेळी पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच चांगले संस्कार, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन केले. तसेच, सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी स्वावलंबी आणि सक्षम भारत घडविण्यासाठी युवकांनी आपले सक्रिय योगदान द्यावे, असे मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास सरपंच विमलताई ठाणगे, छबुराव ठाणगे, बाबासाहेब गुंजाळ, रामभाऊ चत्तर, राजू ठाणगे मेजर, मंगेश ठाणगे मेजर, एस. टी. पादीर सर यांच्यासह आजी–माजी सैनिक, ग्रामस्थ, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# चितळेरोडवर १५ दिवसा पासून सकाळी रोज वाहते गटाराचे पाणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



येथील चितळेरोडवर १५ दिवसा पासून रोज सकाळी गटाराचे पाणी वाहते त्याचा त्रास हा सर्वसामान्य पादचारी,गाडीवाले व येथील व्यवसायिकांना होत आहे अनेक वेळा अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त,मनपा प्रशासन, महावितरण कार्यालय,प्रभाग अधिकारी व आरोग्य अधिकारी, महापौर उपमहापौर याना भेटून व अनेक वेळा निवेदने देऊन हि त्रास बंद व्हायला तयार नाही, येथील गटार चौकअप झाली कि ६ महिन्यात पुन्हा हे पाणी वाहायला सुरुवात होते.

तेलीखुट पासून दत्त मंदिर चौपाटी कारंजा असा मोठा पावसाळी नाला चितळेरोड पोलिस चौकी समोर सदर नाल्यावर महावितरणची डी पी मुळे चार वर्षापासून पूर्णपणे चोकअप आहे. सध्या महावितरणच्या डीपी मुळे नाल्याची साफ सफाई करता येत नाही.मनपाचे आरोग्य विभागाचे अनेक वेळा प्रयत्न केले त्यास यश आले नाही.त्यामुळे नाल्यातील पाणी रस्त्यावर वाहते व नालीमधील घाण पाणी पावसाळ्या मध्ये चितळेरोड रस्त्यावर वाहते.त्यामुळे नागरिकांना व व्यावसायिकांना त्रास होतो व मनपा ची बदनामी होते.मनपा प्रशासनाने व आम्ही सदर डिपी बाबत महावितरणच्या अभियंता यांना समक्ष भेटून तसेच लेखी अनेक तक्रारी दिल्या परंतु काही कार्यवाही झाली नाही.

सध्या मनिष कलेक्शन चितळे रोड पासून लक्ष्मीबाई कारंजा या भुयारी गटारीचे व रस्त्याचे काम चालू आहे.चितळेरोड पोलिस चौकी समोरील बंद गटारीला बाय पास करून काम चालु असलेल्या भुयारी गटारीस जोडल्यास अनेक वर्षांपासून प्रलंबित असणार प्रश्न सुटेल व काही अडचण येणार नाही

# न्याय देणार, मला आठ दिवस द्या : डॉ. सुजय विखे पाटील



**केलवड येथील मयत अक्षय रजपूत यांच्या कुटुंबीयांची घेतली भेट; कर्नाटकातील घटनास्थळी तपासासाठी पोलिस पथक पाठविण्याच्या सूचना**

राहाता (समर्थ गांवकरी)

केलवड येथील अक्षय दशरथ रजपूत यांच्या मृत्यू प्रकरणाची जबाबदारी आपण घेतली असून, या प्रकरणात कुटुंबाला योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी मला आठ दिवसांचा वेळ द्या, असे आश्वासन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी मयत अक्षय रजपूत यांच्या कुटुंबीयांना दिले.

तालुक्यातील केलवड गावातील अक्षय दशरथ रजपूत यांच्या मृत्यू प्रकरणाची माहिती घेतल्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांनी रविवारी सायंकाळी त्यांच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करत संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली.

# देशभक्तीच्या रंगात रंगले जय मल्हार विद्यालय; स्वातत्र्य दिन उत्साहात साजरा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)





जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा, तालुका पारनेर या विद्यालयामध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. यावेळी जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव ॲड.पांडुरंग गायकवाड,संस्था पदाधिकारी, पालक,ग्रामस्थ,माजी विद्यार्थी,विद्यार्थिनी, मुंबईकर, पुणेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी विद्यालयाचे ध्वजारोह पिंपळगावचे सुपुत्र,माजी पी.एस.आय मुंबई बाबाजी विठ्ठल जगताप यांच्या शुभ हस्ते संपन्न होऊन कार्यक्रमाची सुरवात झाली. प्रभातफेरी,ग्राम पंचायत,सेवा सहकारी सोसायटी, एडीसीसी बँक, यांचा संयुक्त ध्वजारोहण मुख्य चौकात संपन्न झाला. शिक्षक गरकळ सर यांनी सर्व ग्रामस्थ सर्व विद्यालयातील विद्यार्थी यांना व्यसनमुक्ततेची व साक्षरतेची शपथ दिली.नंतर विद्यार्थी विद्यालयांमध्ये दाखल झाले.

विद्यालयाच्या प्रांगणामध्ये विद्यार्थ्यांची समुदायिक कवायत, विद्यार्थी भाषणे,बक्षीस वितरण समारंभ आणि सांस्कृतिक कार्यक्रम मान्यवरांचा उपस्थितीत संपन्न झाला.पहिली ते दहावीच्या प्रथम ३ येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्थेतर्फे दरवर्षी दिली जातात. ती ॲड. पांडुरंग गायकवाड व सर्व ग्रामस्थ यांच्या शुभहस्ते बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

दरम्यानच्या काळात रवींद्र नवले,सुभाष महादु घुले(उद्योजक)मुंबई व शरद खोसे यांच्या पुढाकारातून खझड अधिकारी श्री तुकाराम मुंढे साहेब यांच्या जीवनावरील तुकाराम या दहा पुस्तकाचा संच विद्यालयास भेट दिल्याबद्दल त्यांचे आभार विद्यालयाकडून व्यक्त होत आहे. गावातील दानशूर व्यक्तिमत्व पीएसआय बाबाजी जगताप यांनी विद्यालयाला लेझीम साहित्य संच व शैक्षणिक साहित्य दिल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.आठवी,नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर भाषणे हा खूप मोठा कौतुकाचा विषय ठरला काही ग्रामस्थांनी तर या भाषणाला रोख बक्षीस देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यानंतर देशभक्तीपर गीते सादर करून वातावरण देशभक्ती ने भारावून गेले.

# झेडपी शाळेमुळे उंचखडक बु गावची ओळख महाराष्ट्रात पोहचली : आरटीओ श्रीकांत मंडलिक

अकोले (समर्थ गांवकरी)

नोकरी निमित्तिने आम्ही राज्यभर फिरत असतो. अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांच्या बैठकीत माझी ओळख देताना उंचखडक बु गावाचे नाव सांगितले की, तुमच्या गावची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फार चांगली झाली आहे. आम्ही सोशल मीडियावर पहात असतो अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आम्हाला मिळतात. त्यामुळे झेडपी शाळा, देवस्थान, सदन शेतीमुळे उंचखडक बु गावचे नाव महाराष्ट्रात पोहचले असे प्रतिपादन आरटीओ श्रीकांत मंडलिक यांनी केली. यावेळी त्यांनी दिंडोरी तहसिलदार मुकेश कांबळे यांनी नाशिक येथील मिटींगमध्ये उंचखडक बु शाळेचा उल्लेख केल्याचा संदर्भ दिला. ते झेडपी शाळा उंचखडक बु येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी ध्वजारोहनाप्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अगस्ति कारखान्याचे मा. संचालक भाऊमामा खरात होते.

मंडलिक पुढे म्हणाले. की, माझ्या मागिल पिढी मंदिरात बसून शिक्षण घेत होती, मी शेणाने सारविलेल्या दोन खोल्यांमध्ये शिक्षण घेतले आणि आताच्या पिढीला प्रशस्त इमारत, डिजीटल रुम व सुसज्ज व्यवस्था दिसते आहे. म्हणून तर अपाली शाळा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा यात उपक्रमाच प्रथम आली, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात निवड झाली, शाळेला आयएसओ मानांकन मिळाले, पहिल्याच प्रयत्नात तीन विद्यार्थी नवोदय विद्यालयास निवडले, दोन विद्यार्थी सैनिकी स्कुलसाठी व विविध स्पर्धा परिक्षेत अनेक विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. तालुक्याच्या ठिकाणाहून विद्यार्थी गावाकडे शाळेत येतात ही उंचखडक बु शाळेच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे. यात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. सागर शिंदे आणि त्यांच्या टिमचे फार अथक परिश्रम आहे. हे सर्व राजकारण विरहीत टिकेले अशी अपेक्षा मंडलिक यांनी व्यक्त केली. तर अध्यक्षपदी असणारे भाऊमामा खरात म्हणाले. की, गेल्या काही दिवसांपासून शाळेत राजकीय हस्तक्षेप होताना दिसतो आहे, तो फार खेदजन वाटतो. तीन वर्षापुर्वी ही शाळा बंद पडली होती, ती सागर शिंदे आणि गावातील तरुणांनी सुरु केली आहे. मात्र, आता जर शाळा बंद पडली तर पुन्हा चालु होणार नाही. त्यामुळे, शाळेत जो अनावश्यक हस्तक्षेप चालु आहे तो थांबविला पाहिजे. गोरगरिबांची लेकरं शाळेत शिकतात त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा घाट कोणीही घालु नये. आम्ही शाळेच्या पाठीशी भक्कम उभे आहोत. आजकाल काही शिक्षक देखील शाळा सोडून तेथे राजकारण करु पाहतात. मात्र, त्यांनी गुणवत्तेचे काम चोख पार पाडले पाहिजे असे म्हणत खरात यांनी शिक्षण व्यवस्थेचे कान टोचले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ड. सागर शिंदे यांनी सर्व आर्थिक



खर्च मांडला. तर, मुख्याध्यापक अण्णासाहेब मरभळ व क्षिरसागर मॅडम यांनी सुत्रसंचालन केले तर वाळुंज मॅडम यांनी आभार मानले. श्यामराव देशमुख व अक्षय देशमुख यांनी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी पालक, गावकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### हर घर तिरंगा' अभियानाने जामखेड दुमदुमले

**सभापती राम शिंदेंसरांच्या सहभागाने देशभक्तीचा जल्लोष**



जामखेड (समर्थ गांवकरी)

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या रॅलीमुळे जामखेडमध्ये देशभक्तीमय वातावरण निर्माणझाले होते.'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी जामखेड ग्रामीण व शहर मंडलाच्या वतीने आयोजित 'तिरंगा दौड रॅली' जामखेड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

यावेळी ४०० फूट लांबीचा भव्य तिरंगा हातात घेऊन नागरिकांनी एकजुटीने आणि शिस्तबद्धपणे रॅलीत सहभाग नोंदवला.स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या रॅलीमुळे जामखेडमध्ये देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.

राष्ट्रध्वजाचा सन्मान, देशासाठी अभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना जनमानसात अधिक दृढ करणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला.या रॅलीमध्ये ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, मुख्य अधिकारी अजय साळवे, त्रिदल आज माजी सैनिक संघाचे अध्यक्ष सेवानिवृत्ती कॅप्टन लक्ष्मण भोरे, गटविकास अधिकारी शुभम जाधव, जामखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, गटनेते तात्याराम पोकळे, बांधकाम समिती सभापती मोहन पवार, प्रवीण होळकर,नगरसेवक हर्षद काळे, प्रवीण चोरडिया, नंदा होळकर, श्रीराम डोके, सीमा कुलकर्णी, अमित चिंतामणी, प्रा, विकी घायतडक, अर्जुन म्हेत्रे, विजय कुलकर्णी, राम पवार आदी मान्यवरांसह शासकीय अधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, तिन्ही दलांतील आजी-माजी सैनिक, पोलीस अधिकारी, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच छ्उउ प्रशिक्षणार्थी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### साईदास परिवारचा पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संकल्प



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

उपमहापौर धनंजय जाधव श्री साई द्वारका ट्रस्ट यांच्या ग्रीन सिटी या संकल्पनेतून साईदास परिवार ट्रस्ट यांची पायी दिंडी सालाबादप्रमाणे अहिल्यानगर ते शिर्डी साठी जाते .यावर्षी साईदास परिवार ट्रस्टने एक अतिशय स्तुत्य संकल्प केला आहे.

पायी दिंडी दरम्यान पालखीचा ज्या ४ ते ५ ठिकाणी मुक्काम असेल,त्या प्रत्येक ठिकाणी ३ ते ५ झाडे लावून पर्यावरण संवर्धन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

या संकल्पाची सुरुवात आज बोलगाव फाटा येथील साईबाबा मंदिर परिसरात करण्यात आली. दुपारच्या भोजनावेळी साईबाबा मंदिर परिसरात तीन झाडांची लागवड करण्यात आली.तसेच राहुरी फॅक्टरी,बाभळेश्वर या मुक्कामाच्या ठिकाणी वृक्षरोपण करण्यात आले.

उपमहापौर धनंजय भैया जाधव यांच्या सहकार्याने पर्यावरण संवर्धनाचे हे कार्य असेच अविरत सुरुराहणार आहे असे ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले.

### शिवपाणंद रस्त्यांची मोजणी पूर्ण; मजबुतीकरणाला मिळणार प्राधान्य

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने विधानसभा क्षेत्रीय समि तीची बैठक तहसील कार्यालय, श्रीगोंदा येथे विधानसभा सदस्य तथा समितीचे अध्यक्ष विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तालुक्यात आतापर्यंत ६५ शिवपाणंद रस्त्यांची मोजणी पूर्ण झाली असून, या रस्त्यांची एकूण लांबी सुमारे १२५ किलोमीटर आहे.

मोजणीदरम्यान संबंधित रस्त्यांच्या हद्दी व खुणा निश्चित करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता या रस्त्यांची अंदाजपत्रके तयार करून प्रशासकीय म ान्यतेसाठी उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर भाग, अहिल्यानगर यांच्याकडे पाठविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

लोकसहभागातून शिवपाणंद रस्ते खुले करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या संबंधितांचे यावेळी अभिनंदन करण्यात

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

संगमनेर (समर्थ गांवकरी)

पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट २०२६ रोजी देशभक्ती, उत्साह आणि अभिमानाच्या वातावरणात मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने संपूर्ण शाळा परिसर तिरंग्याच्या रंगांनी सजला होता. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना जागृत करणाऱ्या विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.

कार्यक्रमास सुकेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती योगिता सातपुते प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच शाळेचे पालक समितीचे सदस्य आवर्जून उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. प्रमुख पाहुण्या, प्राचार्या, पालक समिती सदस्य आणि मान्यवरांचे औक्षण व स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

त्यानंतर स्वातंत्र्यसंग्रामातील थोर स्वातंत्र्यसैनिक, राष्ट्रपुरुष आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. प्रमुख पाहुण्या श्रीमती योगिता सातपुते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तिरंगा अभिमानाने फडकत असताना राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि राज्यगीताने संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारून गेले. पोदारच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध आणि दिमाखदार संचलनातून शिस्त, आत्मविश्वास, एकता, नेतृत्वगुण आणि समर्पणाचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांची कदमताल आणि उत्स्फूर्त सहभाग उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रेरणादायी भाषणांमधून स्वातंत्र्याचे महत्त्व, राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका आणि जबाबदार नागरिक म्हणून विद्यार्थ्यांची कर्तव्ये अधोरेखित झाली.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने शाळेत निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, जबाबदार नागरिकत्व आणि राष्ट्रनिर्मिती अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून व अभ्यासपूर्ण विचारांतून प्रभावी लेखन केले. स्पर्धेतील उत्कृष्ट लेखनाची दखल घेत विजेत्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या पुरस्कारांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सर्जनशील आणि वैचारिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळाले.

इयत्ता सातवीच्या ऋश्रू आणि खपषळपळीं या वर्गातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उत्साहपूर्ण देशभक्तिपर नृत्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. नृत्य, संगीत आणि प्रभावी सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी भारताच्या विविधतेतील एकता आणि राष्ट्रप्रेमाची भावना सुंदररीत्या व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शाळेच्या आदरणीय प्राचार्या श्रीमती मीनाक्षी मिश्रा यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन. आपल्या विचारपूर्ण भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा खरा अर्थ सम जावून सांगितला. केवळ अधिकारांचा उपभोग घेणे म्हणजे स्वातंत्र्य नसून, आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवणे, प्रामाणिकपणे वागणे, इतरांचा आदर करणे, पर्यावरणाची काळजी घेणे आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी योगदान देणे हीच स्वातंत्र्याची खरी भावना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्यासोबतच ती पूर्ण करण्यासाठी सातत्य, शिस्त आणि जबाबदारीची जोड देण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि राष्ट्रासाठी सकारात्मक योगदान देण्याची प्रेरणा निर्माण झाली.

स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता, स्वातंत्र्यसैनिकांचे त्याग, देशाच्या लोकशाही मूल्यांचे महत्त्व आणि नागरिक म्हणून असलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा अनुभव ठरला. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी' हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील ध्रुवी



खताळ आणि हितेन मणियार यांनी प्रभावीपणे केले. आपल्या ओघवत्या निवेदनातून त्यांनी कार्यक्रमातील प्रत्येक टप्प्याची सुरेख सांगड घालत उपस्थितांना कार्यक्रमाशी जोडून ठेवले.

## मंत्रालयात सामान्य जनतेला सकाळी ११ वाजता प्रवेश मिळावा; सामाजिक कार्यकर्ते मोहन रोकडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

पारनेर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांना आपल्या कामांसाठी मंत्रालयात मंत्र्यांची किंवा अधिकाऱ्यांची भेट घेण्यासाठी मुंबईत यावे लागते. मात्र मंत्रालयात प्रवेशासाठी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने, सामान्य जनतेला सकाळी ११ वाजताच मंत्रालयात प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी पारनेर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते मोहन सुभाष रोकडे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



रोकडे यांनी १३ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आपल्या कामांसंदर्भात मंत्रालयात मंत्री अथवा अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी येत असतात. अनेक नागरिक मोठा प्रवास करून मुंबईत दाखल होतात. मात्र मंत्रालयात प्रवेश मिळविताना त्यांना मोठ्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते.

सर्वसामान्य नागरिकांना मंत्रालयात कामानिमित्त येताना दोननंतर प्रवेश दिला जातो, त्यामुळे त्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांना आपल्या कामासाठी योग्य वेळी संबंधित मंत्री किंवा अधिकाऱ्यांची भेट घेता यावी, यासाठी सकाळी ११ वाजताच मंत्रालयात प्रवेश देण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती रोकडे यांनी केली आहे.

सामान्य नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन मंत्रालयातील प्रवेश व्यवस्थेत सुलभता आणल्यास राज्याच्या विविध भागातून येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्यामुळे या मागणीचा शासनाने सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते मोहन रोकडे यांनी व्यक्त केली आहे.

## जखणगाव येथे हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

### हिंगणगाव वॉरियर्सने पटकावला जखणगाव हॉलीबॉल ऑलिंपिक कप!

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नगर तालुक्यातील आरोग्य ग्राम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जखणगाव येथे प्रथमच ऑलिंपिक पद्धतीने शाळाबाह्य हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. क्रिकेटच्या वाढत्या प्रभावाच्या काळात ग्रामीण भागात झालेल्या या स्पर्धेला खेळाडू तसेच पंचक्रोशीतील प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पासिंग बॉल पद्धतीने आणि ऑलिंपिकचे नियम तंतोतंत पाळून झालेल्या या स्पर्धेत परिसरातील तब्बल २० संघांनी सहभाग घेतला. सर्व सामने अटीतटीचे, रंगतदार आणि रोमांचकारी ठरले. स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत हिंगणगाव वॉरियर्स संघाने अंतिम सामना जिंकून जखणगाव हॉलीबॉल ऑलिंपिक कप पटकावला. अरणगाव संघाने चिवट लढत देत द्वितीय क्रमांक मिळवला, तर खारे करजुने संघाने तृतीय आणि जखणगाव संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. गावातील तरुणांसह पंचक्रोशीतील प्रेक्षकांच्या गर्दीने स्टेडियम गजबजून गेले होते. हॉलीबॉल हा कमी वेळेत अधिक व्यायाम देणारा आणि शरीराचा सर्वांगीण विकास करणारा खेळ



असून, त्यातून सांघिक भावना वाढीस लागते, असे मत जखणगावचे लोकनियुक्त सरपंच डॉ. सुनील गंधे यांनी व्यक्त केले.

स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ हिंगणगाव केंद्र शाळेतील स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात पार पडला. प्रथम क्रमांकाचे ५ हजार ५५५ रुपयांचे बक्षीस राजीव गांधी पतसंस्थेचे अध्यक्ष उद्धवराव दुसुंगे यांच्या वतीने, द्वितीय क्रमांकाचे ३ हजार ३३३ रुपयांचे बक्षीस उद्योजक अक्षय पानसरे यांच्या वतीने, तृतीय क्रमांकाचे २ हजार २२२ रुपयांचे बक्षीस रिजवान शब्बीर पटेल यांच्या वतीने, तर चतुर्थ क्रमांकाचे १ हजार १११ रुपयांचे बक्षीस डॉ. सुयश गंधे यांच्या वतीने देण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी उपसरपंच किसन कर्डीले, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मुजीब पटेल, इमाम शेख, बबलू गाढवे, अल्ताब शेख, बाळू काळे, थोरे सर, मते सर, योगेश पाडळे यांच्यासह ग्रामस्थांनी विशेष प्रयत्न केले. स्पर्धेच्या आयोजनाने प्रेरित होऊन हिंगणगावकरांनी दिवाळीत तालुकास्तरीय भव्य हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. क्रिकेटसोबतच इतर पारंपरिक खेळांनाही प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे डॉ. सुनील गंधे यांनी सांगितले.

## डिसेंबरपर्यंत नगर-मनमाड महामार्गाच्या त्रासातून नागरिकांची सुटका; सुजय विखे पाटील यांचा दावा

राहुरी (समर्थ गांवकरी)

नगर-मनमाड महामार्गाच्या खडलेल्या कामामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची जाणीव असून, या कामातील अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. डिसेंबरपर्यंत नागरिकांची या समस्येतून सुटका होईल, असा दावा भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला. त्यामुळे महामार्गाच्या कामाला आता प्रत्यक्षात किती गती मिळते, याकडे राहुरीसह नगर-मनमाड मार्गावरील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत देवळाली प्रवरा नगरपालिकेच्या वतीने नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत डॉ. सुजय विखे पाटील यांनी मोटारसायकलवरून सहभागी होत नागरिकांमध्ये देशभक्तीचा उत्साह निर्माण केला. भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते.

रॅलीदरम्यान माध्यम प्रतिनिधींनी नगर-मनमाड महामार्गाच्या खडलेल्या कामाबाबत डॉ. विखे पाटील यांना प्रश्न विचारला. गेल्या काही महिन्यांपासून रस्त्याची दुरवस्था, धुळीचे साम्राज्य, वाहतूक कोंडी आणि अपघाताचा वाढलेला धोका यामुळे नागरिक त्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर कामाला गती कधी मिळणार, असा सवाल त्यांना करण्यात आला.

यावर बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, महामार्गाच्या कामात काही अडचणी निर्माण झाल्या असून त्या दूर करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. केवळ सोशल मीडियावर पोस्ट करणे किंवा वारंवार आंदोलन करण्यापेक्षा प्रत्यक्ष रस्ता पूर्ण होणे महत्त्वाचे आहे. नागरिकांना होत असलेल्या त्रासाची आपल्याला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे काही काळ संयम ठेवावा. डिसेंबरपर्यंत या समस्येतून नागरिकांची सुटका होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महामार्गाच्या कामातील दिरंगाईवर भाष्य करताना त्यांनी मिश्किल शैलीत, मी मेंदूचा डॉक्टर आहे; पण राजकारणात आलो आणि माझाच मेंदू खराब झाला,अशी टिप्पणी केली. नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून, मात्र नगर-मनमाड महामार्गाच्या कामाला अपेक्षित गती मिळत नसल्याचे त्यांनी मान्य केले.

युद्धजन्य परिस्थितीमुळे डांबराच्या उपलब्धतेवर परिणाम झाला असून त्याचा विकासकामावर परिणाम झाल्याचेही डॉ.





विखे पाटील यांनी सांगितले. त्यामुळे महामार्गाच्या प्रश्नावर केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा काम पूर्ण करण्यावर भर देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**सिस्पे प्रकरणावरून निलेश लंके यांच्यावर उपरोधिक टीका**

दरम्यान, सिस्पे प्रकरणातील आरोपींना आपल्या कार्यकर्त्यांनी शोधून काढल्याचा दावा खासदार निलेश लंके यांनी केल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांच्यावर उपरोधिक टीका केली. डॉन को पकडना मुश्किल ही नहीं, बल्कि नामुमकिन था. पण ही नामुमकिन गोष्ट खासदारांनी केली असेल, तर त्यांना नक्कीच 'रॉ'चे अध्यक्ष करायला पाहिजे,असा टोला डॉ. विखे पाटील यांनी लगावला. आरोपींचा शोध घेण्याच्या दाव्यावरून त्यांनी उपरोधिक माध्यमातून लंके यांना लक्ष्य केले.

## जिल्हा परिषद, ठाणे येथे ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

### 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा प्रतिज्ञेसह तंबाखूमुक्ती, मृदा व जलसंधारणाची शपथ

ठाणे (समर्थ गांवकरी)

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हा परिषद, ठाणे येथे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या शुभहस्ते आज, दि. १५ ऑगस्ट, २०२६ रोजी ध्वजारोहण सोहळा उत्साहात पार पडला. ध्वजारोहणानंतर राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. यावेळी 'वंदे मातरम'चे गायन, राष्ट्रगीत तसेच महाराष्ट्र गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हात 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात राबविण्यात येत असून, नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना दृढ करण्यासोबतच राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात येत आहे. जिल्हा परिषद कार्यालयातील



अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यावेळी तिरंगा प्रतिज्ञा घेतली. तसेच तंबाखूमुक्ती, मृदा संवर्धन आणि जलसंधारणाबाबत शपथ घेऊन सामाजिक व पर्यावरणीय जबाबदारी जपण्याचा संकल्प केला. 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत राष्ट्रध्वज पोहोचविण्यासोबतच नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याचबरोबर तंबाखूमुक्त समाजनिर्मिती, मृदा संवर्धन आणि जलसंधारण यांसारख्या विषयांवर जनजागृती करून निरोगी, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक सम जनिर्मितीसाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, कार्यकारी अभियंता बांधकाम दिपाली घोरपडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शोभा शेलार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटिकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, गट विकास अधिकारी काजल दहिवले यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

